श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक

वर्ष १० अंक. ३-४ ] ज्येष्ठ, आषाढ [ श. १८५५



संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका


| | पृष्ठें |
|---|---|
| अनुभव ... ... ... ... ... | १—३ |
| श्री गुरु पौर्णिमेच्या उत्सवाचा कार्यक्रम ... ... | ४ |
| सूचना ... ... ... ... ... | ५ |
| शिर्डीवृत्त ... ... ... ... ... | ६ |
| अनुभव ... ... ... ... ... | ७—१६ |
| श्री संतकथामृत-अध्याय १३, १४, १५, १६, १७ ... | १०३—१३६ |
| अमृतानुभव संस्कृत समश्लोकी ... ... ... | १—१४ |


## विनंति.

बर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, या सालीं V. P. करण्यांत आली नसल्यामुळें ज्यांनीं वर्गणी अद्यापी पाठविली नाहीं त्यांनीं कृपा करून ती खालील पत्यावर पाठवून द्यावी. अथवा V. P. करण्याचें सुचवावें.

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

५१ E. पार्ले रोड, खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार,

**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान.**

---

सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतनें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं.रु.२.

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ तर्खड,**

— प्रकाशक.

# अनुभव

## ॥ श्रीसाई ॥

माझी विश्वविद्यालयाची B. Sc. डिग्रीची परीक्षा चालू होती. पहिल्या प्रश्न-पत्रिकेचीं उत्तरें लिहून झाल्यावर व उत्तराच्या वह्या परत केल्यावर असें आढळून आलें कीं, प्रश्नाचीं उत्तरें कागदाच्या दोन्ही बाजूंस लिहावयास नको होतीं व तशा आशयाची सूचना उत्तराच्या वहीच्या मुखपृष्ठावर स्पष्ट दिली होती. पण नजरचुकीनें ती सूचना वाचण्याचें राहून गेलें व त्यामुळें प्रश्नांचीं उत्तरें नेहमीप्रमाणें कागदाच्या दोन्ही बाजूंस लिहिली गेली. कागदाच्या पाठीमागें लिहिलेलीं उत्तरें परीक्षक तपासतील किंवा नाहीं ह्याविषयीं चिन्ता उत्पन्न झाली व त्याप्रमाणें परीक्षकाच्या कानावर ही गोष्ट घालण्याचें मनांत आलें. पण परीक्षकाच्या नजरेस ही गोष्ट आणण्याकरितां समक्ष भेटण्याची जरुरी होती व त्याकरितां दोनअडीच तासांचा अवधि जाण्यायेण्या व भेटण्यामध्यें गेला असता. परीक्षेच्या दिवसांत जेथें मिनिटाची फुरसत मिळणें कठीण, तेथें दोन-अडीच तास घालविणें म्हणजे एक प्रकारचें संकट वाटलें. एक तर चांगला लिहिलेला पेपर फुकट जात होता, नाहीं तर वेळेचा अपव्यय होत होता. अशा तऱ्हेनें इकडे आड व तिकडे विहीर अशी स्थिति झाली होती ह्या बाबतींत श्रीसाईंचा आदेश त्यांच्या पायीं चिट्ठी टाकून विचारला, तेव्हां परीक्षकास भेटूं नको असें स्पष्ट सांगितलें. तेव्हां मनांत विचार आला कीं, बाबांच्या मनांत आपणास यंदा यश देण्याचें नाहीं, नाहीं तर न भेटण्याच्या आशयाचा हुकुम त्यांनीं केला नसता. अर्थात् त्यांनीं सांगितल्याप्रमाणें परीक्षकास भेटावयास गेलों नाहीं व त्यामुळें वांचविलेला वेळ वाचण्यांत घालविला. पण मनाची मात्र चालबिचल होत होती; तरी पण श्रीसाईबाबा करतील तें बरेंच करतील, अशी आशा होती. असो. सर्व पेपर संपून प्राक्टिकल परीक्षा होण्याच्या आधींच्या काळांत असें कळलें कीं, माझा एक सहाध्यायी होता त्यानेंसुद्धा माझ्याप्रमाणेंच कागदाच्या दोन्ही बाजूंस लिहिलें होतें व त्यानें ती गोष्ट परीक्षकाच्या कानांवर घातली, तेव्हां त्यास असें आश्वा-

सन परीक्षकाकडून देण्यांत आलें की, तूं निर्धास्त राहा. सर्वांचेच पेपर दोन्ही बाजूंनीं तपासण्यांत येतील व तशा आशयाच्या सूचना इतर परीक्षकांस कळविण्यांत येतील. हें ऐकून मनांतील काळजी तर दूर झालीच, परन्तु श्रीसाईबाबांच्या लीलेचें अत्यंत कौतुक वाटलें. पहिल्या प्रथम श्रीसाईंनीं जो न भेटण्याचा सल्ला दिला ( कीं त्यामुळेंच वेळेची बचत होऊन वाचनास वेळ मिळाला ) त्यामुळें उद्भवलेल्या परीक्षेच्या अपयशाविषयीं व बाबांविषयीं थोडी शंका घेतल्याबद्दल मनांत वाईट वाटलें. असो. पुढें परीक्षेचा निकाल सांगून श्रीसाईकृपेनें चांगल्या प्रकारें उत्तीर्ण होऊन दुसऱ्या वर्गांत आलों. ह्याप्रमाणें श्रीसाईबाबांनीं आपल्या लीलेची थोडीशी चुणुक दाखविली.

३० मे १९३३ बाबांनीं हाक मारलेला,

"गुंड्या"

प्रेमपूर्वक सा. न. वि. वि:—

इतके दिवस आपल्याकडे पत्र पाठविलें नाहीं त्याची माफी मागत आहें. आम्ही येथें सुखरूप आहों. आपणाकडे साईमहाराजांचें मासिक पुस्तक जें येतें त्याचा पत्ता कळवावा. मलाही सुरू करणें आहे. माझ्या बीमारींत त्यांचा अंगारा लावण्यानें तबीयत बरी झाली.

वरकड क्षेम. कळावें ही वि.

आपला,

S. R. T.

कृ. सा. न. वि. वि.—मीं मागें माझा अनुभव आपणाकडे पाठविलेला वर्ष ८ अंक १३ यांत आला आहे. त्याप्रमाणें आणखी एक अनुभव आपणाकडे पाठवीत आहें, तो मर्जीनुरूप प्रसिद्ध करण्याची विनंति आहे.

१९२८ सालची गोष्ट. जीरापुरकोर्टांत सखाराम रामचंद्र तिकोटकर हे नाझर होते, त्या वेळीं त्यांचा लहान मुलगा एकदम बिमार जाहला. उपचार

केले, पण कांहीं उपयोग जाहला नाहीं. येथील डॉक्टरही त्या वेळीं सुट्टीवर होते. त्यामुळें ते विशेषच घाबरून माझ्याकडे आले व म्हणाले, "आतां काय करावें ? स्थिति अशी आहे." त्या वेळीं मीं त्यांना सांगितलें कीं, "मी काय करूं शकतों ! पण मजपाशीं श्रीसाईबाबांची उदी आहे, ती घ्या व देवापुढें प्रार्थना करून उदी मुलास लावा व थोडी पोटांतही जाउंद्या." त्यांनीं त्याप्रमाणें केलें. आश्चर्य व चमत्कार हा कीं, उदीचा प्रयोग करितांच ५-१० मिनिटांत मुलास आराम पडून तो खेळूं लागला. त्या वेळीं सर्वांस धन्यता वाटली.

त्यानंतर त्यांची बदली गरोठला जज्जकोर्टांत झाली. तेथेंही त्यांच्या स्वतःच्या बीमारींत असाच अनुभव आला. म्हणून त्यांनीं मला ता. १८-१-२९ ला पत्र पाठविलें. तें अस्सल ह्यासोबत प्रसिद्धीस पाठवीत आहें. त्याच्या उत्तरांत ता. २३-१-२९ ला मीं पत्ता कळविला व त्याप्रमाणें त्यांनीं मासिक सुरू केलें.

यांत विशेष गोष्ट ही कीं, ह्या बीमारींत त्यांच्यापाशीं उदी नव्हती, म्हणून नुसती राख उदी म्हणून श्रीबाबांच्या नांवानें लाविली व त्यानें आराम पडला. ही गोष्ट त्यांच्या स्वतःचे भेटींत त्यांनीं मला कळविली.

म्हणजे फक्त भक्तिभावानें बाबांच्या नांवावर कामें होतात. फक्त निष्ठा बळकट पाहिजे. मग बाबा भक्तांकरितां काय करणार नाहींत !..........

अनन्याचा लाड पूर्ण नारायण चालवी । ऐसी या घरची रीत सांगू मान किती मी ॥
भक्त जैसे धरिती ध्यान तैसे होणे देवासी । तुका म्हणे उठाउठी पाठोपाठी धांवत ॥

ता. ३०-१-३३

आपला नम्र,
दामोदर भगवंत रामपूरकर,
मु॥ जीरापूर, इंदूर स्टेट

# श्रीसद्गुरुसाईबाबा

सालाबादप्रमाणें **श्रीगुरुपौर्णिमेचा उत्सव** मिति आषाढ शुद्ध पौर्णिमा शके १८५५, शुक्रवार, ता. ७ जुलई १९३३ रोजीं श्रीक्षेत्र शिर्डीं येथें श्रीसाईबाबा समाधि-मंदिरांत करण्यांत आला.

## उत्सवाचा कार्यक्रम

**गुरुवार**—आषाढ शु० १४, ता. ६ जुलई १९३३.

सकाळीं—रोजचा कार्यक्रम. दोन प्रहरीं—आरतीनंतर भोजन, चक्रीभजन. रोजचा कार्यक्रम रात्रौ—भजन व चावडी.

**शुक्रवार**—आषाढ शु० पौर्णिमा, ता. ७ जुलई १९३३.

सकाळीं—श्रीच्या समाधीस रुद्राभिषेक, श्रीची पूजा. दोनप्रहरीं—आरती व नंतर प्रसाद. ३ वाजतां संस्थान कार्यकारी मंडळाची सभा. ५ वाजतां शिर्डी संस्थानच्या भक्तमंडळाची शके १८५४ ची १२ वी वार्षिक सभा. रात्रौ—रथाची मिरवणूक.

**शनिवार**—आषाढ व० १ ता. ८ जुलई १९३३.

सकाळीं—काला, तीर्थप्रसाद.


सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस.
रा. आ. तर्खड, ऑ. खजिनदार.
बापुराव रा. बोरावके,
ऑ. दुय्यम चिटणीस.
रघुवीर भा. पुरंदरे,
ऑ. दु. खजिनदार.

मोरेश्वर विश्वनाथ प्रधान.
तात्याजी गणपत पाटील कोते.
बाळकृष्ण विश्वनाथ देव.
सखाराम बळवंत धुमाळ.
वासुदेव नारायण चांदोरकर.
**श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानचे**
**विश्वस्त (ट्रस्टीज)**


ज्येष्ठ व. १२ शके १८५२
**शिर्डी** ता. १९ जुलई १९३३

सेवेशीं साईदास,
**केशव गोपाळ बुटी.**

श्री साईलीला कर्ते यांस:—

नमस्कार वि. वि. गेल्या चैत्र महिन्याचें मासिक "श्रीसाईलीला" वाचली. एप्रिल महिन्याच्या शिर्डी वृत्ताच्या सदराखालील पान ५ वर संस्थानचे सेक्रेटरी रा. रा. नवलकर यांनीं भक्तजनांची राहण्याची गैरसोई दूर होण्याकरितां संस्थानच्या मालकीच्या जागेवर दोन खोल्या व ओटा अशा सोईचीं घरें बांधलीं म्हणजे त्यांची राहण्याची सोई होईल अशी सूचना भक्तांच्या माहितीसाठीं दिली आहे; परंतु संस्थानजवळ भरपूर रक्कम नसल्यामुळें तूर्त त्यांना कांहीं करतां येत नाहीं.

मी अशी नम्र सूचना करतों कीं, भक्तजनांनीं मनावर घेतल्यास ही अडचण दूर होईल. श्रीबाबांचे भक्त पुष्कळ आहेत. शिवाय त्यांपैकीं नेहमी जाणारेही बरेच आहेत. मला वाटतें कीं, जर दोन खोल्यांच्या घराला ३००-४०० रुपये खर्च लागल्यास पुष्कळसे भक्त अशीं घरें बांधावयाला तयार होतील. यामुळें स्वतःची सोइ होईलच, शिवाय दुसऱ्या भक्तांनासुद्धा अडचणीच्या वेळीं फार उपयोग होईल. रा. रा. नवलकर यांनीं जर विशेष माहिती "श्रीसाईलीलेंत" दिली तर ज्या भक्तांना अशीं घरें बांधण्याची इच्छा आहे त्यांच्याकडून मागणी येईल.

वरील सूचनेचा संस्थानकमिटी लवकरच विचार करील अशी आशा आहे.

आपला,

**नागेश आत्माराम सावंत**

# श्रीसाईबाबा

## जून महिन्याचें शिर्डीवृत्त

जून महिन्यांत शिर्डी येथें २० संतप्रेमी बांधव व साईभक्त देवकार्या-करितां व दर्शनास निरनिराळ्या ठिकाणांहून आले होते. त्यांत हैदराबाद संस्थानांतील राजा किसनप्रसाद, राजा नरसिंग राजा, राजा भवानीसिंग वगैरे भक्तजन होते.

सोलापूर येथील श्रीयुत कृष्णाजी सीताराम बडवे हे मुलाचें जायवळ काढण्याकरितां आले होते. त्यांनीं श्रींच्या समाधीस अभिषेक केला. सातारा येथील श्रीयुत गणेश शंकर हर्पे यांनीं श्रींस अभिषेक केला, व सवाशीण-ब्राह्मण घातले. मह्रू येथील कॅप्टन व डॉ. वि. गो. हाटे ह्यांनीं श्रींचे गुरुचे समाधीपुढें दर गुरुवारीं व शुक्रवारीं धूप टाकण्याचा क्रम पुढें चालू ठेवला आहे. दादर येथील श्रीयुत दादाजी गोपिनाथ हे दर गुरुवारीं श्रींस अभिषेक करितात.

मुंबई ता. ३-७-३३ }

सुं. द्वि. नवलकर,
ऑ. चिटणीस.

# श्रीसाईसमर्थ

## रा. रा. रामचंद्र आत्माराम तर्खड

तीर्थस्वरूप बाबासाहेब यांस आनंदराव परशराम डोळस यांचा साष्टांग नमस्कार. मी खालीं श्रीसंतचूडामणि श्रीसद्गुरु साईबाबांचे मला आलेले दोन अनुभव पाठवितों, ते आपणांस योग्य वाटल्यास आपण आपल्या साईलीलेंत दाखल करावे.

मी दरवर्षी फक्त श्रीरामनवमीस उत्सवास शिर्डीस जात असतों; पण माझ्या खात्यांत मर्यादित कारभारी असल्यामुळें रजा घेऊन जाण्यास व एकाच माणसाच्या माथीं स्वत:चें काम मारून जाणें मोठें मुष्किलीचें होतें. तरी पण कांहीं असो, श्रीचे कृपेंकरून आजमितीपर्यंत रजेबद्दल कोणींही अडथळा आणला नाहीं व इत:पर येणार नाहीं अशी श्रीजवळ माझी अहोरात्र प्रार्थना असते. तसेंच ह्या कामीं माझ्या खात्यांतील श्री. शंकर नारायण फाळके व श्री. सीताराम गंगाराम सावंत ह्या दोन गृहस्थांची मला श्रीशिर्डीस जाऊन रामोत्सवास हजर राहण्याची फारच मदत होते, याबद्दल मी त्यांचा फारच आभारी आहें. वरील दोघे गृहस्थ श्रीसाईलीलेचे वर्गणीदार आहेत.

मी शिर्डीस जाण्याची तयारी दोनतीन दिवस अगोदर करून ठेवतों. यंदा माझ्यासोबत शिर्डीस येणारे श्री. दत्ताराम महादेव कुळकर्णी, मालाड, व माझ्या नातेवाईकांपैकीं श्री. पंढरिनाथ शिवराम कोरडे, मुंबई, असे दोघे होते. त्यांची ही शिर्डीस जाण्याची प्रथम खेप होती. दोघे गृहस्थ मला कोठेंही भेटले तरी यंदा आपण शिर्डीस रामनवमीस जाण्यास केव्हां निघणार ? कारण यंदा आमचा देखील श्रीशिर्डीस येण्याचा विचार आहे व आपल्या सोबतीनें आम्हांस तेथें कांहींच पाहावें लागणार नाहीं; आपण तेथें वारंवार जात असतां, तेव्हां आपणांस तेथील जास्त माहिती आहे, असें म्हणत. पण मी त्यांना माझ्या रजेचें निश्चित नसल्यानें नक्की असा कांहींच जबाब देत नसें. तरी पण त्यांस

एवढेंच सांगत असें कीं, मला बाबांची परवानगी मिळाल्यास मी आपणांस बोरिबंदरवर भेटेन; जर मी भेटलों नाहीं तरी आपणांस शिर्डीस जाणारी भक्तमंडळी त्या गाडीनें आपोआप भेटून आपली विचारपूस करून समागमानें शिर्डीस घेऊन जातील, त्याबद्दल आपण काळजी करूं नये.

ज्या दिवशीं मी शिर्डीस जाण्यास निघणार त्या दिवशीं श्री. फाळके यांस आज मी रात्रीच्या मेलनें श्रीरामजन्मास शिर्डीस जाणार आहें व तेथून दोनतीन दिवसांनीं परत ऑफिसला हजर राहीन असें कळविलें; तेव्हां त्यानें सांगितलें कीं, या आठवड्यांत एक दिवस आड असे बँक हॉलीडे आले आहेत; तर आपण दोनतीन दिवसांची रजा घेण्यापेक्षां हा सबंध आठवडा भोगावा व पुढील आठवड्यांतील रजा आपल्या मित्रांस श्री. सावंत यांस द्यावी. ही प्रेरणा केवळ श्रीबाबांनीं केली असावी असें वाटतें व आठवड्याच्या रजेमुळें मला काल्याच्या कीर्तनाचा लाभ मिळाला, हें पाहून माझा आनंद गगनांत मावेनासा झाला.

त्या दिवशीं दुपारीं ऑफिसांतून संध्याकाळीं ४ वाजतां लवकर रजा काढून रात्रीची मेलगाडी गांठण्याकरितां आलों. श्री. कोरडे माझ्या संगती शिर्डीस निघण्याकरितां त्याच दिवशीं माझ्या मुक्कामीं आले होते, ते माझी रजेबद्दल काय झालें, याची विवंचना आणि मार्गप्रतिक्षा करीत होते. मी मुक्कामीं पोंचल्यावर श्रीबाबांनीं ऑफिसमध्यें माझ्या रजेबद्दल घडवून आणलेला चमत्कार निवेदन केला. आम्ही दोघे रात्रीच्या गाडीनें शिर्डीस जाण्याकरितां बोरिबंदर स्टेशनवर येण्यास कांदिवलीहून बी. बी. रेल्वेनें निघालों, व त्यांस मी सांगितलें कीं, कदाचित् ह्या गाडीनें मालाडहून श्री. दत्तात्रय महादेव कुळकर्णी हे देखील शिर्डीस जाण्यास निघतील. इतक्यांत आमची गाडी मालाड स्टेशनवर पोंचली व आम्ही दोघे ज्या डब्यांत बसलों होतों तो डबा देखील श्री. कुळकर्णी त्यांच्याबरोबर नातेवाईक यांचे समोर उभा राहिला व त्या सर्व मंडळींना माझ्या भेटण्यामुळें प्रेम व आदर वाटला व त्या आनंदांत ते आपल्या मित्रांस म्हणूं लागलें कीं, ‘ पाहा, बाबांची लीला अगाध आहे. आपण ज्यांच्या

सोबतीचो श्रीशिर्डीस जाण्यास इच्छा करीत होतों तीच व्यक्ति आपल्यासमोर दत्त म्हणून श्रीबाबानें उभी केली.' व अशा अनेक बाबांच्या लीलांचें वर्णन करीत आम्हीं सर्व मंडळी बोरिबंदरवर पोंचलों. तेथें ज्या मेलगाडीनें आम्हीं जाणार होतों त्या गाडींत देखील आमची बरीच मित्रमंडळी भेटली व आम्हीं सर्वांनीं मिळून एका डब्यांतून मनमाडपर्यंत सुखानें प्रवास केला व श्रीशिर्डीस सुखरूप पोंचलों. तेथें सुद्धा एकत्र ठिकाणीं एका खोलींत काल्याच्या कीर्तनापर्यंत मुक्काम केला व तेथून निघतांना एकत्र निघालों. पण ठरविलेल्या मोटरवाल्यानें आम्हांस चकविलें; कारण आम्हीं निघतांना शिर्डींत प्रकट झालेले संतरत्न भाऊ कुंभार यांची परवानगी घेऊन निघालों होतों; पण आमच्यापैकीं श्री. वैद्य यांस दुसऱ्या दिवशीं निघण्याची परवानगी दिली होती; पण आमच्यापैकीं कोणीच लक्ष दिलें नाहीं, व आम्हांस खरोखरीच गाडीमुळें रखडावें लागलें व येण्यास दुसरा दिवस उजाडला.

आपला नम्र सेवक

**आ. प. शे.**

# अनुभव २ रा

श्रीगुरुपौर्णिमेच्या आदल्या दिवशीं म्हणजे गुरुवार ता. ६ जुलै १३ रोजीं बँक हॉलीडे होता. पण मला ऑफिसमधून अर्ध्या दिवसानें रजा मिळाली व मी लवकरच घरीं आलों. दुसऱ्या दिवशीं श्रीगुरुपौर्णिमा असल्यामुळें माझा विचार सकाळीं पहाटेस उठून श्रीसाईबाबांच्या फोटोची दरसालप्रमाणें पूजा करून नंतर ऑफिसला जावें असा होता, म्हणून मी आदल्या दिवशी फोटो साफसूफ करून व घरांतील मंडळीस फुलांच्या हाराची व पूजेची तयारी ठेवण्यास सांगितलें. इतक्यांत संध्याकाळीं माझ्याबरोबर रामनवमीस श्रीशिर्डीस श्री. दत्तात्रय महादेव कुळकर्णी गेले होते ते माझ्या मुक्कामीं आपल्या नातेवाईकाबरोबर व चिरंजीवाबरोबर आले व मला आपण ही कसली तयारी चालविली आहे हें विचारिलें. तेव्हां मी त्यांस थट्टेनें श्रीशिर्डीस उद्यां गुरुपौर्णिमा आहे, करितां ही सर्व खटखट चालली आहे, नंतर आपणांस उद्यांच्या उत्सवाबद्दल निमंत्रणपत्रिका आली काय, असें विचारलें, तेव्हां मी त्यांस ती दाखविली. नंतर ते म्हणाले, 'आपण कोणत्या गाडीनें शिर्डीस जाण्यांस निघणार व रजा किती दिवसांची मिळाली आहे ?' मी त्यांस सांगितलें कीं, ही सर्व मीं आपली थट्टा केली व थोडया वेळानें ते आपल्या मुक्कामास निघून गेले.

मला थोडया दिवसांपूर्वी सर्दीनें फारच त्रासून सोडिलें होतें व त्यामुळें गुरुवारीं रात्रीं सुमारें १२–३० च्या सुमारास सडकून ताप भरला व छातींत दुखूं लागलें; मी झोंपेंत बरळूं लागलों, त्यामुळें धाकटया बंधूची झोंपमोड होऊन तो मला जागें करूं लागला व 'आपण असे झोपेंत कां बरळतां' असें त्यानें मला विचारलें. तेव्हां मीं त्यास सांगितलें कीं, माझ्या छातींत बारा मारतो. तेव्हां त्यानें अमृतांजन लावण्यास सांगितलें व आपण झोंपी गेला. नंतर पुन्हां सुमारें १२–४५ वाजतां मला स्वप्न पडलें, तें येणेंप्रमाणें:—

प्रथम श्रीशिर्डीच्या मंदिरासमोरचा सभामंडप दिसला; पण त्यांत कीर्तन ऐकण्यास मंडळी नसून फक्त श्री. दासगणूमहाराज उभे होते; पण त्यांस

श्रीबाबांसारखी दाढी होती व त्यांच्या गळ्यांत फुलांचे व तुळशीचे हार होते व त्यांच्या चरणाजवळ मी एकटाच बसलों होतों व ते जो काय उपदेश करीत होते तो येणेंप्रमाणें:—

अरे आन्या तुझी इच्छा शिर्डीच्या प्रत्येक उत्सवास येण्याची फार असते; पण ती नाइलाजाची गोष्ट आहे. तुला मंगळ असल्यामुळें तुझा तापट व क्रोधी स्वभाव आहे. तूं प्रत्येक उत्सवात माझी दक्षणा खार म्हाताऱ्या-जवळ पाठवितोस, ती मला तो बिनचुक पाठवितो हें लक्षांत ठेव. तुझा बाप रामदासी होता. त्याचा गुरु हरि ठाकूर होता व बाप गेल्यापासून तूं त्याचे पाय पुजतोस व मी देखिल रामास पुजतों. म्हणून आपण आपल्या बापाचा पंथ धरून रामनवमी उत्सवांत शिर्डीस येत जावें."
इतकें सांगून मी त्यासंबंधानें कांहीं त्यांस विचारणार होतों, तोंच ते गुप्त झाले व मी देखील झोंपेंतून दचकून उठलों व त्या रात्रीपासून मी तापानें आजारी पडलों व सकाळीं तापामुळें स्नान करितां आलें नाहीं व श्रीबाबांची व्यासपूजा मला अंतरली, ती माझ्या धाकटया बंधूनें साजरी केली.

वरील स्वप्नांत श्रीबाबांचा काय हेतु आहे ते तेंच जाणण्यास समर्थ आहेत. कळावें लोभ असावा.

---

**टिपः**—१ आन्या=आनंदराव. २ मंगळ=मंगळ ग्रह. ३ खार=खाररोडवर राहणार. ४ म्हातारा=बाबासाहेब तर्खड. ५ हरि=श्री. ठाकुरद्वारचे हरीबुवामहाराज. ६ ठाकूर=ठाकुरद्वार.

आपला नम्र सेवक,

**आ. प. डो.**

ॐतत्सत्

# श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईबाबा प्रसन्न

श्रीयुत रा. रा. बाबासाहेब यांस सा. न. वि. वि. श्रीसद्गुरुमाउलीच्या क्षणोक्षणीं घडणाऱ्या लीला पाहून मोठें कौतुक वाटतें, व प्रेमाचें भरतें येऊन कांहीं अनुभव द्यावे अशी स्फूर्ति उत्पन्न होते, व ह्याकरितांच खालील अनुभव आपल्या श्रीसाईलीला मासिकांत देण्याकरितां आपणाकडे पाठवीत आहें. तरी आपणास योग्य वाटल्यास घ्यावे.

१

सन १९२९ सालीं चैत्र महिन्यांत मीं डहाणूस रजेवर होतों. डहाणूपासून १८ मैलांवर श्रीमहालक्ष्मी देवीचें देवस्थान आहे. तेथें चैत्र शुद्ध पौर्णिमेला मोठी यात्रा भरत असते. स्थान फार रमणीय आहे. यात्रा चैत्र शुद्ध एकादशीपासून भरण्यास सुरवात होते व चैत्र वद्य अष्टमीपर्यंत असते. माझे वडील दरसाल सर्व मंडळीला घेऊन श्रीजगदंबेच्या दर्शनास जात असत. मीही बहुत करून दरसाल श्रीमातु:श्रीच्या दर्शनाकरितां जात असतों. ह्या सालीं सर्व मंडळीला घेऊन श्रीच्या दर्शनासकरितां जाण्याचा विचार निश्चित झाला व त्याप्रमाणें तेथें जाण्याकरितां गाड्यांची व राहण्याकरितां जागेची वगैरे व्यवस्था केली. चैत्र शुद्ध चतुर्थीला श्रीक्षेत्र पंढरपूर येथें श्रीपांडुरंगाच्या दर्शनाकरितां गेलों व तेथून श्रीक्षेत्र शिर्डी येथें श्रीरामनवमीच्या उत्सवाकरितां जाणार होतों; परंतु श्रीसद्गुरुमाऊलीची लीला अगाध असल्यामुळें पंढरपुरचे उपाध्ये एकसारखे मजला शिर्डीस न जातां ह्या वेळीं डहाणूस जा असें सांगूं लागले व मीही त्यांच्या म्हणण्याप्रमाणें डहाणूस गेलों. तेथें गेल्यानंतर दुसऱ्या दिवशीं माझा मुलगा एकाएकीं आजारी झाला. परंतु श्रीबाबांच्या कृपेनें २-३ दिवसांत ताप वगैरे जाऊन तब्बेत हुशार झाली. फक्त अशक्तपणा होता, म्हणून वैद्यानें यात्रेस न नेण्याविषयीं सांगितलें. इतक्यांत डहाणूचीं हवा एकाएकीं बिघडली व मी मुलांना घेऊन अंधेरीस आलों. माझ्या कुटुंबानें श्रीजगदंबेला मुला-

विषयीं कांहीं नवस केले होते व त्याच वर्षी नवस पुरविले पाहिजेत असा तर आग्रह घेऊन बसली. मीं म्हणालों, मुलाची तब्बेत अद्यापि इतक्या लांब नेण्यासारखी नाहीं. अशक्तपणा बराच आहे; आपण पुढें जाऊं. श्रीसद्गुरु साईबाबांचे पाय धरले आहेत, तरी आपणाला घाबरण्याचें कारण नाहीं. श्री समर्थ आहेत; परंतु ती कांहीं केल्या ऐकेना. अखेर अष्टमीच्या होमाच्या वेळीं श्रीक्षेत्र महालक्ष्मीस सर्व मंडळीला घेऊन गेलों. तेथें गेलों त्याच दिवशीं रात्रीं मुलाला ताप आला व तो एकसारखा रडूं लागला. तेथें औषध वगैरे देण्यास कांहींच साधन नव्हतें; मुलगा कांहीं केल्या रडण्याचा थांबेना. दुसऱ्या दिवशीं सकाळीं श्रीजगदंबेच्या देऊळांत जाऊन सर्व नवस वगैरे पुरविले. मुलाच्या अंगांत ताप होताच, रडणेंही चालूच होतें. त्या वेळी सर्व भार श्रीजगदंबेवर ठेवून राहिलों होतों. संध्याकाळीं पुन्हा श्रीच्या देऊळांत मुलाला घेऊन गेलों व श्रीअंबेच्या कपाळांतून कुंकवाचा अंगारा काढून श्रींची प्रार्थना करून मुलाला लाविला व बाहेर बाजार वगैरे पाहण्याकरितां गेलों. तरी मुलगा रडण्याचा बंद होईना. शेवटीं मुलाला घेऊन सर्व मंडळी श्रीच्या देवळाच्या माडीवर जाऊन बसलों व श्रीमातु:श्रीला बरें वाटेल तसें ती करील, असें मीं म्हणालों. पांच मिनिटांच्या आंतच मुलाला इतकी गाढ झाप लागली कीं, आम्ही त्याला तसाच झोंपलेला घेऊन प्रसादाकरितां मिठाई वगैरे घेण्याचें तें घेतलें, सर्व बाजार पाहिला व ज्या ठिकाणीं उतरलों होतों तेथें उघड्या गच्चींत मुलाला झोंपविला. तो सर्व रात्रींत न उठतां दुसऱ्या दिवशीं सकाळीं जागा झाला व ताप वगैरे कांहीं नव्हता. तब्बेत अगदीं हुशार होती. ह्यावरून मीं तर असेंच समजतों कीं, श्रीसाईमाउलीनें श्रीजगदंबेच्या ठिकाणीं माझी निष्ठा अढळ केली, व सर्व ठिकाणीं मी आहें अशी शिकवण दिली.

## २

श्रीसद्गुरु माउलीच्या कायमनिधि-फंडाकरितां ललितकलादर्श नाटक मंडळीचें मालक यांनीं तारीख २ माहे मार्च सन १९३२ रोजीं सत्तेचा गुलाम हा खेळ करून त्याचें उत्पन्न खर्चापोटीं कांहीं रक्कम वजा करून फंडाकडे दिलें.

हा खेळाच्या उत्पन्नाबद्दल संस्थानच्या भाविक व्यवस्थापकमंडळीमध्यें वाटाघाट चालली असतां मी तेथें गेलों व माझें मत विचारलें, तेव्हां मी खेळा-संबंधीं इच्छा प्रदर्शित केली. त्या प्रमाणें खेळ वगैरे झाला. तिकिटें कशा संपतील ही माझ्या मनाला चिंता होती. परंतु सर्व भार श्रीमाउलीवर असल्यामुळें माझ्याजवळील बहुतेक तिकिटा विशेष प्रयास न पडता संपल्या. कांहीं शिल्लक असलेल्या तिकिटा खेळाच्या आदल्या दिवशीं संध्याकाळीं संस्था-नचे ऑनररी सेक्रेटरी ( श्रीयुत सुंदरराव नवलकर ) यांजकडे परत दिल्या व त्यांच्याकडून कुलीन स्त्रियांच्या ग्यालरीच्या तीन तिकिटा घेऊन अंधेरीस घरीं गेलों. घरीं गेल्यानंतर पावणेदोन रुपयाच्या दराचें तिकिट एकजण मागूं लागला. पावणेदोन रुपयाच्या दराच्या तिकिटा सर्व संपल्या. फक्त १।२ तिकिटा शिल्लक होत्या,त्या मुंबईस सेक्रेटरीकडे आहेत व त्यांनींही सर्व शिल्लक असलेल्या तिकिटा नाटकाच्या थिएटरांत विक्रीकरितां दिल्या असतील असें त्यांस सांगितलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं म्हणजे खेळाच्या दिवशीं एका श्रीमंत सद्गृहस्थाचा मुलगा सव्वादोन रुपयांच्या दराचें तिकिट घेण्याकरितां माझ्या घरीं आला. परंतु तिकिटा थिएटरांत विक्रीकरितां दिल्या. माझ्याजवळ तिकिट शिल्लक नाहीं असें मीं त्यांस सांगितलें. तेव्हां त्यानें सव्वादोन रुपयाच्या दराचें तिकिट घेऊन ठेवण्याकरितां मला सांगितलें. कुलीन स्त्रियांच्या ग्यालरीच्या दोन तिकिटा मज-जवळ शिल्लक राहिल्या म्हणून त्या परत देण्याकरितां ऑनररी सेक्रेटरी यांच्या-कडे सकाळीं ११॥ वाजतां गेलों व सव्वादोन रुपयांचें तिकिट आपणाजवळ असल्यास मला पाहिजे, असे त्यांना म्हणालों. ते म्हणाले,"सव्वादोन रुपयांच्या तिकिटा नाटक कंपनीकडे विक्रीकरितां दिल्या, फक्त पावणेदोन रुपये दराच्या दोन तिकिटा मजजवळ आहेत,त्या घेऊन जा." मी म्हणालों त्या आतां कोठें संपणार ? बरें, एक तिकीट द्या. परंतु श्रीयुत नवलकरानीं त्या दोन्हीं तिकिटा मजजवळ दिल्या.त्या तिकिटा घेऊन परत जाण्याकरितां जिन्याची पायरी उतरतों इतक्यांत विलेपार्लें येथून स्वर्गवासी परमपूज्य काकासाहेब दीक्षित यांचे चिरंजीव श्रीयुत रामकृष्णराव तेथें आले, त्यांना पाहतांच मी त्यांस विचारिलें "आपण का आलांत ?" ते म्हणाले, माझ्याजवळ सव्वादोन रुपयांच्या दरांचें

एक तिकिट आहे तें परत देण्याकरितां आलों आहें. हे त्यांचे उद्गार ऐकतांच मजला अत्यानंद झाला, व श्रीसद्गुरुमाउलीची आठवण होऊन ही त्यांचीच लीला आहे, असें निःसंशय वाटून तें तिकिट अंधेरीस ज्या सद्गृहस्थास पाहिजे होतें त्यास दिलें. पावणेदोन रुपये दराच्या दोन तिकिटा घेऊन पहिल्या प्रथम मी ऑफिसांत आलों. ऑफिसांत येतांच माझ्या बाजूला माझा मित्र बसत असतो, त्यास आतां फक्त दोन तिकिटा मजजवळ आहेत, आपली मर्जी असल्यास त्यांतील एक तिकिट घ्यावें. हे सद्गृहस्थ पहिल्यापासून तिकिट घेण्याचें नाकारीत होते, परंतु त्या दिवशीं कांहींएक न बोलतां तात्काळ एक तिकिट घेतलें. आतां फक्त एक तिकिट मजजवळ राहिलें, तें घेऊन मी दोन प्रहरानंतर अंधेरीस गेलो व संध्याकाळीं लौकरच खेळाच्या ठिकाणीं मुंबईस येण्याकरितां निघालों. रस्त्यानें चाललों असतां, एक मुलगा घाईघाईनें पाठीमागें आला व पावणेदोन रुपयांचें तिकिट मागूं लागला. त्यास ज्या नंबराचें तिकिट पाहिजे होतें त्याच नंबराचे तिकिट मजजवळ निघालें. त्या मुलालाही आनंद झाला व मी तर श्रीबाबांचे कौतुकच करीत चाललों. हा सर्व प्रकार श्रीबाबांच्या लीलेचाच आहे किंवा नाहीं याचा वाचकांनींच विचार करावा.

**श्री बाबांचा दास**

ता. २१-७-३३

ॐ तत्सत्

# श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईबाबा प्रसन्न

श्रीयुत रा. रा. बाबासाहेब यांस, सा. न. वि. वि. खालील अनुभव माझ्या एका मित्रानें श्रीसाईलीला मासिकांत देण्याकरितां सांगितल्यावरून आपणांकडे पाठविला आहे. तरी आपणास वाटल्यास मासिकांत द्यावा. अनुभव स्वत: मित्रानें सांगितलेला आहे.

शके १८५४ सालीं श्रीरामनवमीच्या उत्सवाकरितां मी शिर्डीस जाण्यापूर्वी श्रीसद्गुरुमाउलीच्या समाधीवरून श्री. ह. भ. परायण दासगणूमहाराज यांच्या हस्तें श्रींच्या पादुका आणण्याकरितां मित्रानें पादुका माझ्याजवळ दिल्या व त्याच्या इच्छेप्रमाणें त्यास पादुका आणून दिल्या. श्रींच्या पादुका त्यास मिळाल्यानंतर श्रींच्या पादुकांची शास्त्रोक्त स्थापना केली. पादुका देव्हाऱ्यांत बसविण्यापूर्वी श्रीसद्गुरुसाईबाबांच्या फोटोची तो पूजा करीत असे; परंतु पादुका देव्हाऱ्यांत बसविल्यानंतर सहा महिन्यांनीं त्यास असें वाटूं लागलें कीं, श्रींच्या फोटोची पूजा करण्याची आतां जरूरी नाहीं, फोटो देव्हाऱ्यांतून काढून दुसरीकडे ठेवावा. हा विचार डोक्यांत येऊन दुसऱ्या दिवशीं फोटो तेथून काढणार इतक्यांत श्रींची मूर्ती त्याच रात्रीं स्वप्नांत दिसली व पहाटेस त्यास 'जो फोटो पूजीत असतोस तो पूजीत जावा. फोटो देव्हाऱ्यांतून काढूं नये' असा आवाज तो झोपला असतांना जवळच ऐकूं आला व तो लगेच जागा झाला. त्यानें फोटो तसाच देव्हाऱ्यांत ठेविला आहे. श्रीबाबांच्या अस्तित्वाबद्दल पदोपदीं साक्ष पटत आहे हें सहज लक्षांत येईल.

**श्री. बाबांचा दास**

ता. २१-७-३३

केशी । अघमलहरा पांडुरंगा ॥ १३१ ॥ तूं आमुचा यजमान । चित्स्वरूप नारायण । आम्हांस दाता तुझ्यावीण । कोणी समर्थ असेना ॥ १३२ ॥ तुझ्यावीण श्रीमंत कोण । तूं सर्वातीत दयाघन । तुझ्या आश्रितें हात जाण । काय पसरावा इतरांपुढें ॥ १३३ ॥ तेणें तुझा कमीपणा । येईल साच नारायणा । तूं समर्थ दाता रमारमणा । भरून आम्हां उरलासी ॥ १३४ ॥ खद्योतानें सूर्यासी । वा ओहोळानें गौतमीसी । वा गर्धभानें अश्वासी । काय देवा लाजवावें ॥ १३५ ॥ राव रंक एक्या पंक्ति । आमुचे हिशेबीं निश्चिती । नको जहागीर मजप्रती । तुजवीण देवा कवणाची ॥ १३६ ॥ ऐसें बोलोन उठे त्वरित । महाराज शुकानंदनाथ । अखेरीचा दंडवत । घालोनी त्या क्षेत्रातें ॥ १३७ ॥ इकडे भूपति पटवर्धन । घेण्या निघाला दर्शन । महाराज गेले पाहून । हळहळला मानसीं ॥ १३८ ॥ म्हणे मी पातकी पूर्ण । मज कोठून घडेल दर्शन । खरे साधुसंतजन । विमुख आम्हां असती ॥ १३९ ॥ हताश होऊन भूपति । गेला निघोन सत्वरगति । पुढें कथा कैशी रीती । घडली ती ऐका पुढें ॥ १४० ॥ स्वस्ति श्रीसंतकथामृत । ऐकतां हरील दुरितांमृत । संत साक्षात भगवंत । आहेत म्हणे दासगणु ॥ १४१ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥ ॥ ॥

॥ इति त्रयोदशोऽध्यायः समाप्तः ॥

# अध्याय १४

श्रीगणेशायनमः। हे निर्विकल्पा निरंजना। ओंकाररूपा दयाघना। विघ्ननगाच्या हनना। करून साह्य व्हावें मसी ॥ १ ॥ मागिलाध्यायीं झाली कथा। सोडोनियां शुकतीर्था। जाते झाले तत्वतां। शुकानंद महाराज ॥ २ ॥ समर्थ आले चंद्रपुरीं। राहिले शिवदत्ताचे घरीं। तेथें कथा कैशापरी। जाहली असे ती ऐका ॥ ३ ॥ तो शिवदत्त ब्राह्मण। शिवभक्तिपरायण। चंद्रमौळी उमारमण। उपास्य दैवत तयाचें ॥ ४ ॥ प्रतिवर्षी माघमासीं। महापर्वणी शिवरात्रीसी। जातसे तो निश्चयेंसी। मल्लिकार्जुना कारणें ॥ ५ ॥ तो महात्मा शिवदत्त। निघाला मल्लिकार्जुनाप्रत। संगें श्रीशुकानंदनाथ। आणिक मंडळी बहुवसी ॥ ६ ॥ मार्गी चालतां दिवस फार। गत झाले साचार। शिवरात्रपर्वणी अखेर। अति निकट पावली ॥ ७ ॥ माघ वद्य त्रयोदशीसी। दुःख झालें मानसीं। तो शिवदत्त पुण्यराशी। रडूं लागला धायधाय ॥ ८ ॥ उद्यां शिवरात्रीचा दिन। तीन मजला मल्लिकार्जुन। राहिलासे येथून। वारी टळते काय करूं ॥ ९ ॥ हे सच्चिदानंदा सर्वेश्वरा। नीलकंठा कर्पूर गौरा। मायबापा करुणाकरा। दर्शन न घडे उद्यां तुझें ॥ १० ॥ माझी शिवरात्र मार्गांत। होणार हे उमानाथ। ऐसें बोलोन आकांत। फार मांडिला शिवदत्तें ॥ ११ ॥ तें पाहून महाराजासी। दया उमजली मानसीं। पाहून पराच्या दुःखासी। साधुच होती विव्हळ ॥ १२ ॥ हृदय साधुसंतांचें। मेणाहून मऊ साचें। साधुसंत कृपेचे। आहेत पूर्ण सागर ॥ १३ ॥ महाराज ह्मणती तयाला। कां रे करितोसी शोकाला। चाल मल्लिकार्जुनाला। नेतों आज अवघ्यांसह ॥ १४ ॥ तीन मजला

मल्लिकार्जन । जरी आहे येथून । परी झांका आपुले नयन । जाऊं आतांच ते स्थानीं ॥ १५ ॥ नयन झांकितां मल्लिकार्जनीं । वाहनासह एका क्षणीं । भक्त पोहोंचले येवोनि । आश्चर्य करिती सकळिक ॥ १६ ॥ हें स्वप्न अथवा जागृती । ऐसें परस्पर बोलती । कोणी अंगास चिमटे घेती । स्वप्नपरीक्षा करावया ॥ १७ ॥ नाहीं ह्मणती खचित स्वप्न । हें स्थान मल्लिकार्जन । शूळपाणी पार्वतीरमण । समर्थांनीं भेटविला ॥ १८ ॥ अवघे करिती जयजयकार । शिरें ठेविती पायांवर । शुकानंद साधु थोर । म्हणती ईश्वर असे हो ॥ १९ ॥ तीन दिवसपर्यंत । केली यात्रा आनंदांत । तेथून महाराज सदनाप्रत । यावयासी निघाले ॥ २० ॥ आतां भाल्की ग्रामींचा । वृत्तांत ऐका तुम्हीं साचा । आत्मसमूह महाराजांचा । होता अवघा चिंताकुल ॥ २१ ॥ कृष्णाबाई रात्रंदिन । करी पुत्राचें चिंतन । क्षणक्षणां तिचे नयन । पावे भरून अश्रूंनें ॥ २२ ॥ राम जातां वनवासास । दुःख जाहलें कौसल्येस । तैसेंच कृष्णाबाईस । जहालें असे तेधवां ॥ २३ ॥ सती म्हणे हे इंदिरावरा । मनमोहन श्यामसुंदरा । वैकुंठनिवासी शारंगधरा । माझी दया देऊं दे ॥ २४ ॥ माझा पुत्र येवो घरीं । हे मुकुंदा रावणारी । माझी म्हातारीची खरी । काठी काननीं ठेवूं नको ॥ २५ ॥ तों महाराज आले अकस्मात । जननीस घातलें दंडवत । मातेपरी दैवत । नाहीं दुजें पुत्रातें ॥ २६ ॥ कृष्णा म्हणे हे कुमारा । मयोदरींच्या कोहिनुरा । आजवरी देशांतरा । कां रे तान्हुल्या हिंडलासी ॥ २७ ॥ ऐसें बोलोन अंकावरी । बसविलें तयातें सत्वरीं । हात फिरवूनि तयास । सांगते झाले तेधवां ॥ २९ ॥ काननीचें वर्तमान । पित्याप्रति केलें कथन । उमापतीनें तें ऐकून । मंत्र दिधला षोडशी ॥ ३० ॥ शुकानंद हेंच त्यांनीं । नांव ठेविलें त्यालागुनी । पुढें लौकिक रीतींनीं ।

प्रपंच करूं लागले ॥ ३१॥ सानंदवृत्ति सदोदित। षड्रिपु जोडोनी हात। राहती पुढें तटस्थ। शुकानंदनाथांच्या ॥ ३२ ॥ नित्य यात्रा नवी येई। भाल्की ग्रामालागीं पाही। श्रीशुकानंद शेषशायी। वाटूं लागला जनांना ॥ ३३ ॥ हळोपाळी पसरली मात। भाल्कीस जन्मले भगवद्भक्त। साधु शुकानंदनाथ। अवतार सुदामदेवाचे ॥ ३४ ॥ जे साधुसंत सन्मती। त्यांसी नावडे निजकीर्ति। ढोंगी थोतांडी धांव घेती। कीर्तीस मिठी मारावया ॥ ३५ ॥ परी ती पळे दूर दूर। त्यांचेपासून साचार। स्तुतीस योग्य जे कां नर। त्यांना ती नावडे ॥ ३६ ॥ याच न्यायें घरांतून गेले महाराज पळून। पाहिलें एक निबिडारण्य। ग्रामासन्निध बसावया ॥ ३७ ॥ काननीं राहाती षण्मास। षण्मास येती गृहास। ऐसा क्रम कित्येक दिवस। चालला भाल्कींत तयाचा ॥ ३८ ॥ मध्यंतरी गोष्ट घडली। अलौकिक एक भली। ती मी सांगतों ये स्थळीं। श्रोते तुह्माकारणें ॥ ३९ ॥ जेष्ठ भ्रात्याच्या पत्नीस। घेऊन जातां माहेरास। मध्यंतरीं काननास। तृषा लागली तियेतें ॥४०॥ तैशींच तिचीं मुलें दोन। मागूं लागलीं जीवन। बोबड्या शब्दें करून। शुकानंद महाराज ॥ ४१ ॥ तो दिवस उन्हाळ्याचा। ऐन वैशाख मासाचा। समय दोन प्रहरचा। प्रखर झाला चंडकिरण ॥ ४२ ॥ तप्त झालीसे मेदिनी। पक्षीही न उडती गगनीं। मृगजळास पाहूनी। धांवूं लागले मृगवर ॥ ४३ ॥ ऐसी आली कठीण वेळ। झाली तहानेनें व्याकूळ। तेधवां ती लहान बाळ। पाणी मागती चुलत्याला ॥ ४४ ॥ आल काका लागली तहान। पाजीं आम्हांस जीवन। जीभ कोरडी पडून। गेली पाहा आमुची ॥ ४५ ॥ तैसीच ह्मणे भावजय। तें ऐकून गुरुराय। शुकानंद महासदय। द्रवते झाले मानसीं ॥४६॥ पात्र घेऊनियां करीं। निघाले महाराज साक्षात्कारी। साच निर्जळ माळावरी। पाणी आणाया

कारणें ॥ ४७ ॥ एक धोन्डा उलथून । करूं लागले गुरुं स्तवन । भ्रातृ कांता गाडींतून । तो प्रकार पाहातसे ॥ ४८ ॥ हे गौतमी गोदे भागीरथी । यमुने नर्मदे सरस्वती । कृष्ण प्रवरे भीमरथी । येथें प्रगटी बायांनो ॥ ४९ ॥ मम बंधूचीं मुलें नहान । व्याकूळ झालीं तान्हेनें । या साठीं । जीवन मशीं पाहिजे ये ठायां ॥५०॥ ऐसा होतां मधुर ध्वनी । भूमींतून आलें पाणी । अति स्वच्छ थंड जागीं । गोड अमृतापरी जें ॥ ५१ ॥ पाल मात्र बुडेल । इतका झरा झाला खोल । पाहा केवढें संतबळ निर्मिलें । पाणी निर्जल वनीं ॥ ५२ ॥ घेतला तांब्या भरून । मुलांस पाजिलें जीवन । संतुष्ट झाले अवघे जन । त्या उद-काच्या सेवनें ॥५३॥ आनंदली भ्रातृकांता । कळली दिराची योग्यता । पुढें कैसी घडली कथा । तें ऐका सांगतों ॥ ५४ ॥ शिवा नामें कन्या जाण । झाली महाराजा लागून । लक्ष्मीचें दर्शन । घ्यावया गेले कोल्हा-पुरीं ॥ ५५ ॥ त्या करवीर क्षेत्रांत । एक ब्रह्मचारी होता सत्य । मंत्र-शास्त्राचे ग्रंथ । जवळ त्याच्या असती ॥ ५६ ॥ परी त्याची समज त्यासी । नच पडे निश्चयेंसी । ब्रह्मचारी मानसीं । उद्विग्न असे त्या योगें ॥ ५७ ॥ एके दिनीं अंबिका । स्वप्नीं त्याच्या प्रकटली देखा । बोलली हे अर्भका । कष्टी ऐसा होऊं नको ॥ ५८ ॥ एक साधू मंदि-रांत । माझ्या आला सांप्रत । नाम शुकानंदनाथ । अवतार जो सुदा-माचा ॥ ५९ ॥ उद्ईक जाई त्याकडे । तो तुझें पुरविल कोडें । शुका-नंद ज्ञान गाढें । जगत्रयीं जाण पां ॥ ६० ॥ त्यांचा होतां उपदेश । मंत्रविद्या ये फळास । तृषित गेलिया गंगेस । समाधान पावे मनीं ॥६१॥ उठोनिया दुसरे दिवशीं । येता झाला राउळासी । ह्मणे कोठें भेटतील मशीं । शुकानंद महाराज ॥ ६२ ॥ जोडोनिया दोन्ही कर । केला साष्टांग नमस्कार । श्रीशुकानंद योगीवर । तुम्हीच कां हो महा-

राजा ॥ ६४ ॥ महाराज म्हणती तयासी । मी न जाणें शुकानंदासी । सांगतों मंत्र शास्त्रासी । तेवढें तुवां ऐकावें ॥ ६५ ॥ मंत्र शास्त्राचें निरुपण । यथार्थ केलें त्यालागून । तेणें ब्रह्मचारी आनंदोन । शिष्य झाला तयांचा ॥ ६६ ॥ तेथून महाराज कृष्णातीरीं । पंचगंगा संगमावरी । नरसिंहवाडीभीतरीं । येवोनिया राहिले ॥ ६७ ॥ जेथें तृतीय दत्त अवतार । नरसिंह सरस्वतियतिवर । राहते झाले संगमावर । कृष्णा-पंचगंगेच्या ॥ ६८ ॥ संगमाचें करून स्नान । घेतलें दत्ताचें दर्शन । साक्षात् अत्रिनंदन । भेटता झाला ते ठायीं ॥ ६९ ॥ कांहीं दिवस वास केला । तया कृष्णातटाला । दत्तासी करोनी चर्चेला । आत्मज्ञान संपादिलें ॥ ७० ॥ ज्यास झालें ब्रह्मज्ञान । त्याचें बोलणें खुंटे जाण । परी लौकिकीं रीत अनुसरून । महाराज वर्तू लागले ॥७१॥ शिवानामें कन्येसी । आली मुऱ्हाळी न्यावयासी । तैं महाराजांनीं तियेसी । उपदेश केला तो ऐका ॥ ७२॥ डोळे पुशित नमस्कार । केला शिवेनें साचार । भरून आला तिचा ऊर । म्हणे बाबा मी येतें ॥ ७३ ॥ लोभ ठेवा कन्येवर । मी तुमची आजाण पोर । याच चरणांचा आधार । आहे मशीं जगत्रयीं ॥ ७४ ॥ ऐसें बोलतां कन्यका । धरलें तीस हृदयीं देखा । करीं न बाळे वृथा शोका । वचन ऐक हें माझें ॥ ७५ ॥ पतिगृहीं गेल्यावरी । गरिबीनें वागें खरी । वडिल जनांचा ना करी । कदाही तूं उपमर्द ॥ ७६ ॥ जावा नणंदा दीर भावे । यांसीं प्रेम धरावें । सासुश्वशुरा वंदावें । मानून त्यां दैवत ॥ ७७ ॥ तुझा पती तुझा देव । ऐसा ठेवीं शुद्ध भाव । कुटिलपणा न देई ठाव । आपुल्या शुद्ध मानसीं ॥ ७८ ॥ विनय सोडूं नको कदा । आनंदवृत्ति राहो सदा । निजपतीच्या आज्ञा कदा । नको वत्से अवमानूं ॥ ७९ ॥ पती कोपी नम्रता । धरावी मनीं सर्वथा । तरीच माझी तूं दुहिता । आनंद

द्वार्या होईल ॥ ८० ॥ तडीतापडी संन्यासी । कोणी येतां गेहासी । त्यांसीं अन्न देण्यासी । कदा नाहीं ह्मणूं नको ॥ ८१ ॥ ऐसा करून उपदेश । वाटे लाविलें कन्यकेस । तोंच पुढें फळास । आला असे तियेच्या ॥ ८२ ॥ जावयातें पंढरपुरीं । विचार केला अंतरीं । तें सच्चिदानंद श्रीहरी । स्वप्नीं तयांच्या प्रगटला ॥ ८३ ॥ तो घनःश्याम सांवळा । तुळशी पुष्पांचे हार गळां । आपाद रुळे वनमाळा । मृग लांछन तिलक भाळीं ॥ ८४ ॥ ठेविले हस्त कटेवरी । रत्नजडित मुकुट शिरीं । पीतपितांबरधारी । रुक्मिणीपती पांडुरंग ॥ ८५ ॥ देव ह्मणे समर्थांसी । हे मद्भक्ता पुण्यराशी । प्रथम तुळजापुरासीं । जाऊन मग ये पंढरीतें ॥८६॥ बोलून ऐसें भगवान । पावता झाला अंतर्धान । जागे होऊन ज्ञानघन । पाहूं लागले चहूंकडे ॥८७॥ हे मायाबापा विठ्ठला । कां न प्रत्यक्ष भेटें मला । जगदीशा हे जगत्पाला । विश्वव्यापका विश्वपती ॥ ८८ ॥ अशी मर्जी तुझी देवा । हे मुरारे वासुदेवा । आतां तरी हे केशवा । पुढें ऐसें करूं नको ॥ ८९ ॥ सर्वेच निघाले भाल्कींतून । आले तुळजापुरा कारण । तेथें सिद्धांचें दर्शन । झालें असे तयांला ॥९० ॥ उभयतांचें बोलणें तेथ । झालें असे श्रोते बहुत । त्याची अपेक्षा असल्या ग्रंथ । गुरु परंपर पाहावा ॥९१॥ पुढें जाऊन पंढरीसी । भेटते झाले विठ्ठलासी । परतून आले भाल्कीसी । आपुल्या ग्रामाकारणें ॥ ९२ ॥ चिंतामणी नांवाचा । पुत्र एक झाला साचा । वाटे बृहस्पतीचा । काय दुजा अवतार ॥ ९३ ॥ उमापती प्रेमें करून । चिंतामणशास्त्री ऐसें जाण । त्या बालका लागून । क्षणक्षणा ह्मणतसे ॥९४॥ पहिल्याच वर्षी स्पष्ट वाणी । चिंतामणीची झाली । जाणी शिकविली उमापतींनीं । दुसऱ्याच वर्षी रूपावळी ॥ ९५ ॥ शब्द चालवी तिसऱ्या वर्षी । तो चिंतामणी ज्ञानराशी । तें पाहून अवघ्यांसी । कौतुक वाटे

बहु साल ॥ ९६ ॥ उमापतीनें समर्थासी । वाहलें निर्वाण समयासी
म्हणूं लागले तयासी । आज्ञा ऐका अखेरीची ॥९७॥ चिंतामणीस शास्त्री
करीं । श्रीवेदव्यासापरी । हीच आशा अंतरीं । आहे माझ्या पुत्र
राया ॥ ९८ ॥ ऐसें बोलून सोडला प्राण । त्रिवार जपून नारायण
उमापतीनें संन्यास ग्रहण । केलें होतें श्रोते हो ॥ ९९ ॥ शुकानंदा
चिये चित्तीं । चिंता उपजली निश्चिती । म्हणें या पुत्राप्रती । कोठें नेवू
शिकवावें ॥ १०० ॥ ऐसी चिंता रात्रंदिन । करित असतां दयाघन
तों समजलें वर्तमान । महाराजांस ऐशापरी ॥१०१॥ श्रीत्र्यंबकोद्भव
गोदावरी । नांदेड नामें एक नगरी । आहे तिच्या उत्तर तीरीं
नाभिस्थाना सन्निध ॥१०२॥ तेथें व्यंकटशास्त्री म्हणून । आहे विद्वान
ब्राह्मण । चहू शास्त्रांचें अध्ययन । वेदवेदांग जाणता ॥ १०३ ॥
वृत्त ऐकिल्यावर । निघाले महाराज सत्वर । जन्मभूमीस नमस्कार
करुनियां अखेरचा ॥ १०४ ॥ पुत्र कांताबरोबरी । महाराज निघाले
सत्वरी । श्रीगौतमी गंगागोदावरी । वंदीते झाले महाराज ॥ १०५ ॥
समर्थ आले नांदेडांत । राहिले सिद्धपुरींत । एकया उघड्या मठांत । पुत्र
कांता घेऊनी ॥ १०६ ॥ चहू बाजूस उभ्या भिंती । आंत खिडक्या
निश्चिती । जेथें नसे मुळीं वसती । शून्य सदन तें होतें ॥ १०७ ॥
वर्षाऋतूचा समय खरा । वरती उघड जासरा । वर्षुनियां जलधारा
चिखल झाला चहूंकडे ॥ १०८ ॥ पंकीं दुर्दुर शब्द करिती । गडगड
घन गर्जती । चमचमा त्या तळपती । मेघोदरीं विद्युल्लता ॥ १०९ ॥
परी महाराज निर्भय । उघड्या मठांत राहिले पाहा । म्हणती माझा
पंढरीराय । योग्य दिसेल तें करो ॥ ११० ॥ नाहीं वस्त्र प्रावर्ण
चिंतामणीस पोटीं धरून । रात्र करिती आक्रमण । पाळीपाळीनें उभे
यतां ॥ १११ ॥ महाराज म्हणती पुत्रामती । माधुकरी मागून चरें सा

चालवीं आपुला चरितार्थ। आमुची चिंता करूं नको ११२ तुझा विद्या-
गुरु येथ। व्यंकटशास्त्री विख्यात। त्याकडे जाय त्वरित। आरंभ कर
शिकावया ॥११३॥ दुसरे दिवशीं पित्राज्ञेनी। तो कुमार चिंतामणी।
शास्त्रीबुवांच्या येऊन सदनीं। जोडिता झाला पाणिद्वया ॥ ११४ ॥
या दिव्य चरणापाशीं। आलों विद्या शिकावयासी। ऐकून आपुल्या
नांवासी। भाळकीहून दयाळा ॥ ११५ ॥ ऐसें बोलतां चिंतामणी।
व्यंकटशास्त्री त्यालागूनी। बोलते झाले मधुर वचनीं। दयार्द्र अंतः-
करणानें ॥ ११६ ॥ तूं अल्पवयी कुमार। कैसा आलास येथवर।
किंवा मातापित्यावर। रुसून आलास ये ठायीं ॥ ११७ ॥ कुमार
ह्मणे ते अवसरीं। आहेत स्वामी बरोबरी। माझीं मातापितरें खरीं
मी न आलों रुसून ॥ ११८ ॥ शुकानंद माझा पिता। जो ज्ञानांबरींचा
दिव्य सविता। गंगा नांवें मदीय माता। ऐसे त्रिवर्ग पातलों ॥११९॥
सिद्धनाथपुरींत। एक्या ओसाड मठांत। मीं आणि माझा तात।
उतरलों कीं समर्था ॥ १२० ॥ माधुकरी मागुन साचार। त्यावरी मी
भरितों उदर। माझा पिता निराहार। गंगोदक प्राशीतसे ॥ १२१ ॥
ऐसें वदतां चिंतामणी। शास्त्री आनंदले मनीं। घेतलें त्यांस ठेवूनी।
सन्निध विद्या शिकावया ॥ १२२ ॥ तत्तात शुकानंदासी। आणविलें
त्यांनीं ग्रामासी। जागा दिधली राहावयासी। गृहांत सखारामाच्या॥१२३॥
चिंतामणीचा लौकिक। उत्तरोत्तर वाढला देख। अवघे करिती कौतुक।
विद्या पाहून तयाची ॥ १२४ ॥ व्यंकटशास्त्र्यांबरोबर। निघता झाला
कुमार। विद्यापीठ पुण्यावर। आपुली विद्या दाखवावया ॥ १२५ ॥
श्रीमंतांनीं सत्कार। केला तयाचा साचार। चिंतामणीचे नांवावर। दीडशें
रुपये घातले ॥१२६॥ ज्ञान पाहून तयाचें। कृष्णशास्त्री खंदारचे॥ झाले
असती प्रसन्न साचे। ह्मणती जामात करूं हा ॥ १२७ ॥ त्या कृष्ण-
शास्त्र्याचा अधिकार। काय वानूं मी पामर उत्तर। कौमुदी नामें थोर।
यांनीं ग्रंथ रचियेला ॥ १२८ ॥ मुहूर्तचंद्र दुसरा ग्रंथ। रचिला गीर्वाण

भाषेंत। हेही त्या वेळीं पुण्यांत। आले होते दक्षणेसी ॥ १२९ ॥ त्यांनी चंद्रभागा कन्यका। देण्याचा विचार केला निका। चिंतामणीलागीं दखा। तेंचि पुढें सत्य झालें ॥ १३० ॥ चंद्रभागेस जयंती। नाम ठेविलें निश्चिती। हेही निघाली महासती। अरुंधतीसमान ॥ १३१ ॥ हे असो उभयतां पितापुत्र। महासाधु परम पवित्र। भजूं लागले सर्वत्र। लोक नांदेडीं तयांला ॥ १३२ ॥ चिंतामणीचा सहाध्यायी। पांडुरंगशास्त्री पाहीं। होता एक तया ठायीं। गरिबी ज्याची अनावर ॥ १३३ ॥ त्याचें दरिद्र विच्छिन्न। करावया कारण। तत्सदनीं जाऊन। खाया मागती शुकानंद ॥ १३४ ॥ पांडुरंगाची जननी। बोलती झाली दीनवदनीं। आम्हां अभाग्यचे सदनीं। कांहीं न तुम्हां द्यावया ॥ १३५ ॥ आपण असतां त्रिकाळज्ञ। खाया मागतां मजलागून। मी अति हीनदीन महाग झालें अन्नासि ॥ १३६ ॥ ऐसी ऐकून तदोक्ती। शुकानंद बोलती। हें न मी ऐकें निश्चिती। कांहीं तरी मज द्यावें ॥ १३७ ॥ ऐसा आग्रह पाहतां। साध्वी उठली तत्वतां। संतोच्छिष्ट गृहीं घडतां। दारिद्र माझें जाईल ॥ १३८ ॥ तिनें भिक्षा मागून। ताक पीठ आणिलें जाण। घालिती झाली भोजन। तेणें महाराज संतुष्टल ॥ १३९ ॥ दिलें तिला आशीर्वचन। तुझें दरिद्र गेलें जाण। एक वर्षांत भाग्य पूर्ण। येईल चिंता करूं नको ॥१४०॥ तेंच पुढें झालें सत्य। धन्य शुकानंदनाथ। प्रसन्न होती ज्यास संत। कमी काय तयास ॥ १४१ ॥ ह्यापुढील अवघ्या कथा। पुढीलाध्यायीं तत्वतां। मी होईन वर्णिता। त्या ऐका भाविक हो ॥ १४२ ॥ स्वस्ति श्रीसंतकथामृत। ऐकतां तुष्टेल रमानाथ। संतकथेचें पुण्य बहुत। आहे म्हणे दासगणू ॥ १४३ ॥ श्रीहरिहरार्पण मस्तु ॥ शुभंभवतु ॥

॥ इति चतुर्दशोऽध्यायः समाप्तः ॥

# अध्याय १५

श्रीगणेशायनमः । हे चित्स्वरूपा आनंदधामा । कैवल्यदात्या कल्पद्रुमा । सर्वव्यापका पुरुषोत्तमा । निगमागमा अगम्य तूं ॥ १ ॥ गताध्यायीं झालें कथन । पांडुरंगाचें दारिद्र्यहरण । केलें निजकृपें करून । शुकानंदनाथांनीं ॥ २ ॥ नांदेड गौतमीचें तीर । भूकैलास साचार । गोदेमुळें महत्त्व थोर । आलें तया ग्रामातें ॥ ३ ॥ अपार क्षेत्रें भूमीवर । वाराणस्यादि साचार । जोंवरी न पाहिलें गौतमी तीर । तोंवरी महती तयांची ॥ ४ ॥ जोंवरी न देखिला वारण । तोंवरी महिष दिसे छान । जोंवरी न देखिला हर्म्य जाण । तोंवरी झोंपडी वाटे बरी ॥ ५ ॥ जोंवरी न देखिला दिनकर । तोंवरी दीप दिसे थोर । तैसें पाहतां गौतमी तीर । क्षेत्रें तुच्छ वाटती ॥ ६ ॥ सहस्त्र तीर्थांचे ठायीं सरी । एक माझी गोदावरी । नमन माझें बद्ध करीं । तया गौतमी गोदेला ॥ ७ ॥ त्या नांदेड नगरांत । सरदेशपांड्यांचें कुळ सत्य । आलाहजरतचे आश्रित । वंशपरंपरेचे असती ॥ ८ ॥ त्या सरदेश-पांडे कुलाला । विपत्तिकाल पातला । जैसा वनवास पांडवांला । आला मागें श्रोते हो ॥ ९ ॥ ते समग्र येथें कथा । जरि झाली वर्णिता । तरी विस्तार होईल ग्रन्था । म्हणून देतों संक्षेप ॥ १० ॥ सरदेशपांडे कमलाकर । परम भाविक उदार । परी स्वारी तयावर । दारिद्र्यानें केली पाहा ॥ ११ ॥ वारणा समवतनदारी । जप्त झाली त्याची खरी । प्रसंग दुर्घट तयावरी । आला असे श्रोते हो ॥ १२ ॥ दोन प्रहरची भ्रांत । आली कमलाकराप्रत । तेणें होऊन दुःखित । वाहे चिंता सर्व काळ ॥ १३ ॥ पहा पहा हो ज्याचे द्वारीं । झुलत होते आजवरी । मोठमोठे मस्त करी । तोच पायीं चालतसे ॥ १४ ॥ चवऱ्या छत्रें अबदागीर । ढळत होते

ज्याचेवर। तोच अनवाणी रस्त्यावर। दैववशें हिंडतसे ।। १५ ।। दहा मनुष्य पंक्तीसी। होते ज्याच्या प्रतिदिवशीं। त्यालाच नित्य एकादशी। होऊं लागली तेधवां ।। १६ ।। जयाचिये अंगावरी। शेले दुशालि जरतारी। तोच बांधी चिंधी शिरीं। पहा कैसा दैवयोग ।।१७।। असो ऐसा कमलाकर। दारिद्र्यें व्यापिला फार। श्रीरामास जोडून कर। स्तवन करूं लागला ।। १८ ।। हे दशरथात्मज जानकीवरा। हे रावणारी करुणाकरा। प्रतापतुंगा दयासागरा। कां रे निष्ठुर झालास ।।१९।। व्यर्थ श्रीमंत कुळांत। मशीं घातलें जन्मास। केसरीनें तृणाप्रत। काय सेवन करावें ।। २० ।। हा दरिद्र धुराळा वारि देवा। मायबापा केशवा। भक्तवत्सला माधवा। निराश मशी करूं नको ।।२१।। माध्यान्ह रात्रपर्यंत। आळविला तो रघुनाथ। तेथेंच झाला निद्रिस्त। सरदेशपांड्या कमलाकर ।।२२।। तो मायालाघवी कमलापती। दीनोद्धारक विश्वमूर्ति। महाराजाकडे त्याच रातीं। जात झाला परमात्मा ।।२३।। जागें करून तयाप्रत। बोलता झाला रघुनाथ। तूं मम गळ्याचा ताइत। अससी कीं शुकानंदा ।।२४।। कलिचीण कलियुगांतरीं। माझा न अवतार भूमीवरी। होणार जाण निर्धारीं। जाणशी तूं भक्तश्रेष्ठा ।।२५।। कलियुगांत संतांचें। आहे वत्सा महत्त्व साचें। संत प्रतिनिधी ईश्वराचे। या युगामाझारीं ।। २६ ।। जो माझा अधिकार। मागें होता साचार। तोच मी दिधला भूमीवर। तुम्हांलागीं ये वेळीं ।।२७।। कमलाकर माझा भक्त। निद्रिस्त आहे मंदिरांत। जाऊन त्याचे स्वप्नांत। उपदेश त्यातें द्यावा तुवां ।। २८ ।। यावानहंमयाभावो। हाच देई मंत्र त्या हो। हें एवढें करी हो। कार्य माझें शुकानंदा ।।२९।। ऐसें बोलतां रमापती। शुकानंद अवश्य म्हणती। आतांच जाऊन त्याप्रती। उपदेश देतों मायबापा ।।३०।। कमलाकराचे स्वप्नांत। प्रगटले शुकानंदनाथ।

होवोनिया दयायुक्त । उपदेश देते जाहले ॥ ३१ ॥ यावानहंमंत्राचा । उपदेश केला त्यास त्याचा । बारा वेळ पाठ त्याचा । तन्मुखानें कर-विला ॥३२॥ देवोनिया आशीर्वचन । गुप्त झाले दयाघन । कमलाकर जागा होवून । उठून पाहे चहूंकडे ॥३३॥ दुसरे दिवशीं नांदेडांत । शोधी शुकानंदाप्रत । अतुर झालें त्याचें चित्त । प्रत्यक्ष दर्शन घ्यावया ॥३४॥ तों अश्वत्थाचे पारावरी । होते महाराज साक्षात्कारी । धांवुनियां पायांवरी । टोपी ठेविली कमलाकरें ॥ ३५ ॥ महाराज ह्मणती तयास । तूं जा भागानगरास । देतों रुपया खर्चास । तुजला एक येकाळीं ॥ ३६ ॥ तुझें वतन थोडेंबहुत । सुटेल जाण निश्चित । प्रयत्नांतीं रमाकांत । फळ देईल कमलाकरा ॥३७॥ प्रसाद घेऊनियां करीं । निघता झाला सत्वरीं । येऊनियां भागानगरीं । भेटला चंदुलालातें ॥ ३८ ॥ तो होऊन प्रसन्न बहुतेक त्याचें सोडिलें वतन । ज्यानें धरिले संतचरण । त्यास अपेश कोठूनी ॥ ३९ ॥ हा सरदेशपांड्या कमलाकर । होता कवि महा चतुर । यानें कविता सुंदर । केली महाराष्ट्र भाषेमध्यें ॥ ४० ॥ पदलालित्य गोड भारी । प्रसाद वाणी असे खरी । उपास्य दैवत रावणारी । सीता-पति रामचंद्र ॥ ४१ ॥ प्रेम कमलाकराचें । गुरुपदीं पूर्ण साचें । जैसा भ्रमर मृणालिनीचे । ठायीं राही लोलुप ॥ ४२ ॥ पुढें शुका-नंदांनीं । घेतलासे संन्यास जाणी । पंढरीक्षेत्रा जाऊनी । विठ्ठलाचे सन्निध ॥ ४३ ॥ एके दिनीं वाळवंटीं । चंद्रभागेचिया कांठीं । भेटता झाला जगजेठी । ब्राह्मणाचे वेषानें ॥ ४४ ॥ तुम्हीं जावें नांदेडासी । गौतमीचे तटासी । सोडून नंदनवनासी । कां आलां या वाटिकेतें ॥ ४५ ॥ ज्यांचा वास गौतमीतिरीं । त्यांनीं न यावें पंढरी । सच्चिदा-नंद श्रीहरी । गौतमी तटा हिंडतसे ॥ ४६ ॥ अवतराचे साठीं । हे पंढरी भीमातटीं । त्यांचेसाठीं जगजेठी । आहे मात्र येथें उभा ॥ ४७ ॥

ती गौतमी गोदास्वर्धुनी । आणिली गौतमें स्वर्गातूनी । तिचे कांठीं पिनाकपाणी । त्र्यंबकरूपें राहिला ॥ ४८ ॥ पांडुरंगासी महत्त्व । तिच्यामुळेंच आलें सत्य । सकल तीर्थें श्रेष्ठ होत । गौतमी गंगागोदावरी ॥ ४९ ॥ पूर्व सुकृत बलवत्तर । ज्याचें असेल तोच नर । पाहील गौतमीचें तीर । सत्य सत्य त्रिवाचा ॥ ५० ॥ गौतमीचें जननस्थान । नारायणाचें पद जाण । गौतमीचें महिमान । शेषही वर्णू शकेना ॥ ५१ ॥ ऐसें ऐकून द्विजवचन । शुकानंद वदती त्याकरण । तुह्मी पंढरीचे असून । कां करितां क्षेत्रनिंदा ॥ ५२ ॥ कीं चंद्रभागेचिया तीरीं । प्रति वैकुंठ पंढरी । सच्चिदानंद श्रीहरी । विटेवरी येथें उभा ॥ ५३ ॥ या पंढरी क्षेत्रांत । जरी झाला प्राणांत । तरी जोडे वैकुंठ सत्य । पाप्यासही साक्षेपें ॥ ५४ ॥ ऐसें वदतां शुकानंदनाथ । तो वेषाधरी रमाकांत । करून हास्य किंचित । बोलता झाला तें ऐका ॥ ५५ ॥ ही प्रतिवैकुंठ पंढरी । परी वैकुंठ नव्हे निर्धारीं । कमलेपरी सुंदरी नारी । परी प्रत्यक्ष कमला नव्हे ॥ ५६ ॥ रंभेपरी चारुगात्री । ऐसा दृष्टांत मात्र देती । परी ती न रंभा निश्चितीं । तोच न्याय ये ठायां ॥५७॥ तैसें न गौतमीचें कांठ । तें साक्षात वैकुंठ । सर्व क्षेत्रांचें आद्यपीठ । गौतमी गंगा गोदावरी ॥५८॥ गौतमीसी अव्हेरून । तत्तीरींचे अवघे जन । अन्य देवांचें अर्चन । करावया आले जरी ॥५९॥ तरी न उपयोग होय त्याचा । अभिमान ईश्वरास गौतमीचा । अपमान निज कन्येचा । न साहवेल पांडुरंगा ॥ ६० ॥ गौतमीसेवेस विन्मुख । जेव्हां जेव्हां होतील लोक । तेव्हां तेव्हां निःशंक । दुष्काळ पडेल भूमीवरी ॥६१॥ यमदूतासही फावेल । तत्साह्यकारी रोग हा कळ । येऊन ठाणें देतील सबळ । भूमीचियां पृष्ठभागीं ॥६२॥ गौतमीद्वेषासी । जाणें यम लोकाशीं । आकल्प भोगण्या रौरवासी । वचन माझें प्रमाण

हें ॥६३॥ श्रीराम जानकीनाथ । त्यानें वंदिलें गौतमीप्रत । येतां पर्वणी सिंहस्थ । तीर्थें येती भेटावया ॥६४॥ कचालागीं संजीवनी । गोदातटीं लाधली जाणीं । शालिवाहन पुण्यखाणीं । तिचे कांठींच जाहला ॥६५॥ महावैष्णव एकनाथ । गौतमीस वंदावया* ॥६८॥ ऐसें उभयतां बोलत । आले महाद्वाराप्रत । राऊळीं येतां जगन्नाथ । गुप्त झाला क्षणार्धें ॥६९॥ ऐसें पाहतां समर्थांसी । दुःख जाहलें मानसीं । भक्तवत्सला हृषीकेशी । कां रे कपट केलें तुवां ॥७०॥ द्विजाचा वेष घेऊनी । मज ठकविलें चक्रपाणी । कां मी पातकी अज्ञानी । तव दर्शना योग्य नसें ॥ ७१ ॥ मी परत जातों नांदेडासी । गौतमीच्या तटासी । तेथें मात्र हृषीकेशी । पाहिजे भेटी दिली त्वां ॥ ७२ ॥ देवास केला नमस्कार । शिर ठेविलें पायांवर । सोडोनियां पंढरपूर । नांदेडासी निघाले ॥ ७३ ॥ गोदावरीचे आसमंत भागीं । येतां शुकानंद योगी । गोष्टी घडली ऐकण्याजोगी । ती ऐका श्रोते हो ॥ ७४ ॥ मुरली घेऊन हातांत । संगें चालिला रुक्मिणीकांत । श्रीहरीचे भजनांत । महाराज तल्लीन जाहले ॥ ७५ ॥ समर्थ म्हणती पुरुषोत्तमा । हे मायबापा राघवा रामा । सज्जनांच्या निवासधामा । मसीं सोडून जाऊं नको ॥ ७६ ॥ या तव मुरलीच्या नादा । म्यां सतत ऐकावें गोविंदा । मज सन्निध आनंदकंदा । अक्षयीं त्वां रहावें ॥ ७७ ॥ अवश्य म्हणे रुक्मिणीपती । मी तव संन्नित निश्चिती । परी येथून नरपती । जाऊं चल भक्तवरा ॥ ७८ ॥ कांकी मी गौतमीतीरा । जेव्हां जेव्हां येत खरा । तेव्हां माझा मलाच साजिरा । विसर पडतो निश्चयें ॥ ७९ ॥ म्हणून मला एखाद वेळ । तुझा विसर पडेल । हें मीं अपुलें गुह्य सकळ । तुजलागीं निवेदिलें ॥ ८० ॥ गोदेपासून द्वय योजन । तिचें तीरींचें महिमान । बोलिलें आहे शास्त्रीं जाण ।

* ६६ । ६७ या ओंव्या सेवकाच्या हस्तप्रतींत नाहींत.

म्हणून चाल वसमती ॥८१॥ तें मानलें नाथासी। जावया ते सगयासी। विचार केला मानसीं। नांदेडांत साजिरा ॥ ८२ ॥ संताजी देशपांड्या वसमतकर। होता एक भाविक नर! त्यानें आपुले जोडोन कर। केली प्रार्थना नाथासी ॥८३॥ आपण चला वसमतास। देतों बांधून मठास। या माझ्या इच्छेस। पुरविलें पाहिजे महाराज ॥ ८४ ॥ तें पडलें पथ्यावरी। महाराज आले वसमतनगरीं। सच्चिदानंद श्रीहरी। होता त्याचे बरोबर ॥ ८५ ॥ महाराज आणि अनंत। ब्रह्मचर्चा करिती नित्य। न विसरती एकमेकाप्रत। जैसी गोडी साखरेची ॥ ८६ ॥ आसना नदीचिये कांठीं। कांहीं दिवस वाळवंटीं। राहते झाले करुन मठी। एकांतवासाकारणें ॥ ८७ ॥ साधु बोधानंदास। समर्थांनीं दिला संन्यास। तारिलें कित्येक भक्तांस। वसमतामाजीं नाथांनीं ॥ ८८ ॥ बोधानंद एके दिनीं। गेले नांदेडा लागूनी। येऊन उतरते झाले सदनीं। माधव मंडईकराच्या ॥ ८९ ॥ हा माधवभट्ट मंडईकर। शुकानंदाचा शिष्य थोर। लीनतेचें आगर। महाचतुर वेदवेत्ता ॥ ९० ॥ बोधानंदालागूनी। केली पुडी त्यांनीं सदनीं। पक्वान्न फेण्या करूनी। वाढल्या पात्रीं जेवावया ॥९१॥ पाहून त्या पक्वान्नास। आठव बोधानंदास झाला तया समायास। शुकानंद सद्गुरुचा ॥९२॥ तो म्हणे ये ठायीं। शुकानंद माझी आ । यावी आज लवलाही। ही फेणी भक्षावया ॥९३॥ तरीच मी बा सेवीन। हें सुग्रास पक्वान्न। ऐसें वचन बोलून। हात आंखडून बैसला ॥९४॥ पाहून तयाचा भाव शुद्ध। तैसीच भक्ति अभेद। प्रगट झाले शुकानंद। मंडईकराचे आगरीं ॥९५॥ पाहुनियां सद्गुरुसी। हर्ष वाटला सकळांसी। लागले शिष्य पायांसी। षोडशोपचारें पूजोनियां ॥९६॥ माधव म्हणे धन्य सदन। म्हणून लागलें सद्गुरुचरण। आळशावरी धांवून। आली साच गोदावरी ॥ ९७ ॥

वरी ।। ९७ ।। लाभ निज पंक्ताचा । निज शिष्या दिला साचा । तेणें लौकिक नाथांचा । झाला अवघ्या जगभर ।।९८।। परत आले वसमती । उभयता स्वामी शीघ्रगती । त्या उभयतां संतांप्रती । नमन माझें अष्टांगीं ।।९९।। शुकानंदाच्या अनंत लीला । मी न समर्थ वर्णण्याला । घुंगुरट्यानें सागराला । कैसें करावें उल्लंघन ।।१००।। असो शके सत-राशें एकुणपन्नास । मासोत्तम जेष्ठ मास । तया मासीं वद्यपक्षास । काय घडलें तें ऐका ।। १०१ ।। वद्य दशमीचा शुभदिन । सूर्योदयाचा समय जाण । ब्रह्मरंध्रीं नेऊन प्राण । देह ठेविला शुकानंदें ।। १०२ ।। शिष्य जपले सभोंवती । दिधली समाधी नाथाप्रती । समाराधनेचा निश्चिती । थाट केला बहुसाळ ।।१०३।। असो हे शुकानंद योगीवरा । कृपामूर्ती गुणगंभिरा । या तुझ्या अज्ञान पोरा । मायबापा विसरूं । नको ।।१०४।। कृपाकटाक्षें अवलोकन । नित्य करावें मजलागून । मी हीन दीन अज्ञान । माझा अभिमान वाहवा ।।१०५।। या शुकानंद चरि-त्रासी । वाचितां पावेल हृषीकेशी । माझ्या बोबड्या बोलासी । आव-डीनें श्रवण करा ।।१०६।। स्वस्ति श्रीसंतकथामृत । वर्णिलें श्रीशुकानंद-नाथ । पुढें माधवाचार्य कथा अद्भुत । परिसा म्हणे दासगणू ।।१०७।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।। शुभंभवतु ।।

।। इति पंचदशोऽध्यायः समाप्तः ।।

# अध्याय १६

श्रीगणेशायनमः ॥ हे गणाध्यक्ष कृपासमुद्रा । हे भक्तचित्तचकोर-चंद्रा । करीं माझा त्वरित भद्रा । अशिव अवघे निवारी ॥१॥ कलियुगांत संतांपरी । कोणी नसे कैवारी । संतांपाशीं श्रीहरी । रहातसे सर्वदा ॥ २ ॥ संत जगाचे सूत्रधार । संत साक्षत् परमेश्वर । संत करुणेचे सागर । ह्मणून ऐका संतकथा ॥३॥ महाराष्ट्र देशाभीतरीं । ल्व्हराळ नामें होय नगरी । श्रीगोदेच्या दक्षिणतीरीं । दूर अडीच योजनें ॥ ४ ॥ या ल्व्हराळ ग्रामींचा । द्विज भिक्षुकवृत्तीचा । वासुदेवाचार्य नांवाचा । महा विद्वान् वेदवेत्ता ॥ ५ ॥ शाखा ज्याची अश्वलायन । गोत्र भारद्वाज जाण । आपुलीं मुलेंबाळें घेऊन । गंगाखेडीं राहिला ॥६॥ वधू त्याची भागीरथी । महा पतिव्रता सती । जेवीं वसिष्ठ अरुन्धती । वा लोपामुद्रा अगस्तीतें ॥ ७ ॥ त्या गंगाखेडालागुन । राजेंद्रबहाद्दर ह्मणून । निजामाचे सरदार जाण । होते गर्भश्रीमंत ॥ ८ ॥ वासुदेवाचार्य त्यांचे पदरीं । राहिले असती चाकरी । विद्वानांना भूमीवरी । मान मिळतो कोठेंही ॥ ९ ॥ या आचार्याच्या उदरीं । पांच अपत्यें झालीं खरीं । त्रयकुमार द्वयकुमरी । ऐका नांवें तयांचीं ॥१०॥ श्यामाचार्य रामाचार्य । तिसरे हे माधवाचार्य । काशी गुजा कन्या पाहा । झाल्या असती तयांना ॥ ११ ॥ या पांची अपत्यांत । माधवाचार्य हिरा सत्य । जैसें रसांत अमृत । वा मण्यांत चिंतामणी ॥ १२ ॥ किंवा दिक्पालीं अमरनाथ । वा अग्नींत गार्हपत्य । वा सुमनीं पारिजात । वा राजहंस खगामध्यें ॥१३॥ माधवाचार्य महापुनित । वेदवेदांगें मुखोद्गत । न्यायव्याकरण तर्कशास्त्र । करतलामल अवघीं ॥ १४ ॥ राधा नामें तयाची । भार्या होय शुद्ध साची । पातिव्रत्य धर्माची । मूर्ति ओतिली विधीनें ॥ १५ ॥ असो

गंगाखेडांत। राजेंद्रराय नृपनाथ। महाउदार म्हणून तेथ। असंख्य येती विद्वान ॥ १६ ॥ त्यांचा पाहून अधिकार। देत दक्षिणानृपवर। अवघी श्यामाचार्यांवर। जबाबदारी परीक्षेची ॥ १७ ॥ कोण कैसा विद्वान किती। हें त्यांनीं पहावें निश्चिती। त्यांच्या सल्ल्यानें नृपती। करीतसे संभावना ॥ १८ ॥ असो श्रोते एके दिनीं। ऐसें घडलें तया स्थानीं। गंगाखेडालागुनी। आले विद्वान बहुसाल ॥ १९ ॥ त्यांची परीक्षा घेण्यास। बाहिलें श्यामाचार्यांस। त्यांनीं आपल्या बंधूस। पाठवाया योजिलें ॥ २० ॥ आचार्य म्हणती माधवा। माझा विचार ऐकावा। गोड न वाटे माझ्या जिवा। त्वां जावें सभेसी ॥ २१ ॥ जे आले असतील विद्वान। त्यांची परीक्षा घेऊन। सांग भूपाकारण। कोण कैसा अधिकारी ॥ २२ ॥ ऐसी ऐकून बंधूक्ति। माधव आले सभेप्रती। जैसा पूर्णिमेचा रजनीपती। नभोमंडळी शोभतो ॥ २३ ॥ घेतली परीक्षा अवघ्यांची। तेथें आवडनिवड कोठची। जग हेंच मूर्ति हरीची। हे जयाची भावना ॥ २४ ॥ ज्याची समदृष्टि जाहली। तया न आवडनिवड उरली। सर्वांघटीं वनमाळी। ऐसें वाटे निश्चयें ॥२५॥ जे खरेखरे सज्जन। ते परांचे घेती गुण। चाळणींपरीं दुर्जन। ग्रहण करिती दोषांचें ॥२६॥ असो माधवाचार्य भूपासी। बोलते झाले विनयेंसी। राजा हे तव गृहासी। आले वेदोनारायण ॥२७॥ यांचा करीं सत्कार। हे समान अवघे साचार। कमी न कोणी तिळभर। करीं समान संभावना ॥२८॥ तें ऐकतां भूपती। साशंक झाला निश्चिती। म्हणे या माधवाप्रती। कांहीं नसे समजलें ॥ २९ ॥ सेवकासी आज्ञा-करी। श्यामाचार्यासी लौकरी। घेऊन यावें येथवरी। काम आहे निकडीचें ॥३०॥ मग श्यामाचार्य येऊन। केलें नृपाचें समाधान। माधवासी घेऊन। येते झाले निजसदना ॥३१॥ बंधूस म्हणे ते अव-

सरीं। तूं टाळकुट्या निर्धारीं। करी तेंच जन्मवरी। हीन प्रारब्ध कळलें तुझें ॥ ३१ ॥ माधवाचार्य हळूच म्हणती। तीच आहे आस चित्तीं। द्यावी आज्ञा त्वरितगती। मजला भजन करावया ॥ ३३ ॥ आपण माझे ज्येष्ठ भ्राता। मशीं पित्यासम तत्वतां। म्हणून पायीं ठेवितों माथा। आज्ञा करा हो लवलाहीं ॥३४॥ तैं श्यामाचार्य कोपून। बोलते झाले त्यालागून। तूं अभागी आहस पूर्ण। इच्छा असेल तें करीं ॥३५॥ ऐसी आज्ञा होतां क्षणीं। माधव आनंदले मनीं। जैसी कामुकालागुनी। रंभा येऊन पडे गळां ॥३६॥ किंवा तृषेनें व्यापिला। तों गंगा ओघ धांविन्नला। तैसेंच झालें आचार्याला। आज्ञा होतां बंधूची ॥ ३७ ॥ कडीं गोफ कंठींचा। त्याग केला तात्काळसाचा। त्या अशाश्वत वस्तूंचा। ज्ञाता न करी संग्रह ॥ ३८ ॥ माधवाची विरक्तता। पाहून तेधवां समस्तां। दुःख अनावर झालें। चित्ता। समजूत घालूं पाहती ॥ ३९ ॥ तुह्मीं आचार्य विद्वान। कां सेवितां बळें रान। सोडून पंचपक्वान्न। कण्या अंबील भक्षूं नका ॥४०॥ नका नका टाकूं प्रपंचमाया। सिद्ध न व्हा काननीं जाया। तुह्मीं विद्या शिकोनियां। काय केला उपयोग ॥ ४१ ॥ ज्याचेजवळी नसे ज्ञान। त्यानें सेवावें कानन। तुम्हीं महाविद्वान। भलतें सलतें करूं नका ॥ ४२॥ अभागी भणंग भिकारी। अज्ञान आळशी निर्धारी। त्यांनीं करावा हरीहरी। संसारियातें न हें योग्य ॥ ४३ ॥ ऐकितां भाषणासी। आश्चर्य वाटलें माधवासी। मायेनें या जनांसी। पहा कैसें ठकविलें ॥ ४४ ॥ जें जें कांहीं अशाश्वत। तें तें भासवी अवघें सत्य। हे सच्चिदानंद रमानाथ। अगम्य माया देवा तुझी ॥ ४५ ॥ त्या मायेपासून। सोडिव देवा मजलागून। हेंचि पदर पसरून। आहे मागणें दासाचें ॥ ४६ ॥ भर्ता वैराग्यसंपन्न। झाला ऐसें पाहून। राधाबाई येऊन चरण। धरिती झाली

पतीचे ॥ ४७ ॥ हे मत्सौभाग्यभांडारा । हे पतीरूप परमेश्वरा । या या दासीची जोडून करा । विनंती आहे या चरणीं ॥१८॥ मी तुमची धर्मपत्नी । देवद्विज आणि अग्नी । यांच्या समक्ष मदीय पाणी । धरिला तुम्हीं प्राणनाथा ॥ ४९ ॥ तुम्हीं मेघ मी सौदामिनी । तुम्हीं इंदु मी रोहिणी । मशीं आपणांवां ुनी । गती नस प्राणेशा॥५०॥ तुम्हीं हिरा मी कोंदण । मी चिंधी तुम्हीं कांचन । तुम्हीं तलवार मी म्यान । त्याग माझा करूं नका॥५१॥ मशीं न्यावें बरोबरी । तुम्हांवाचून निर्धारी । मी न क्षणैक राहें घरीं । सत्य सत्य त्रिवाचा ॥ ५२ ॥ माझी सुखदुःखें साचार । अवघीं अवलंबून तुमचेवर । माझा करून अव्हेर । नका जाऊं प्राणनाथा ॥ ५३ ॥ ऐसें ऐकितां तद्भाषण । माधवाचार्य तिजलागून । करूनियां हास्यवदन । बोलते झाले तें एका ॥ ५४ ॥ तूं कन्या श्रीमंताची । सून थोरामोठ्याची । माझ्या हालापेष्टेची । वाटेकरीण होऊं नको ॥५५॥ तूं आहेस कोमल । ऊन वारा न सोसवेल । क्षुधा तृषेचा न करवेल । ताप तुर्शी सहन कांते ॥५६॥ म्हणून रहा सुखें घरीं । नको येऊंस बरोबरी । हट्ट धरितां अखेरी । पावशील पस्तावा ॥५७॥ वेदांत सांगावया सुघड । परी वर्तण्यासी अवघड । करीं न ृथा बड-बड । शुष्क घनगर्जनेपरी ॥५८॥ ऐसी ऐकितां पतीवाणी । राधा बोले मधुर वचनीं । म्यां कथा ऐकिल्या पुराणीं । त्या मज अजून स्मरतात ॥ ५९ ॥ जनकतनया जानकी सीता । द्रौपदी पांडवांची कांता । वनवास त्यांचे नशिबी येतां । न त्यागिलें पतीस ॥ ६० ॥ अश्वपती तनया सावित्री । वा नलाची दमयंती । हरिश्चंद्राची तारामती । काय भ्याली वनवासा ॥ ६१ ॥ मीही वागेन त्यांच्यापरी । येईन आपुल्या बरोबरी । फुल सुवासा त्यागी जरी । कोण विचारी तयातें ॥६२॥ जळातें त्यागितां लहरी । तिनें जावें कोठें

तरी । जलावांचून निर्धारीं । कोण त्राता तियेतें ॥६३॥ ऐसें भाषण करितां सती । माधवाचार्य तिजप्रती । बोलते झाले या रीतीं । येणें असल्या ऐसें करा ॥६४॥ या वस्त्रालंकारांचा । त्याग करीं प्रथम साचा । गांव सगुण भक्तीचा । जहागीर आपण मेळवूं ॥६५॥ तें पत्नी ह्मणे अवश्य । या उपरणें नेसण्यास । या धनवडी लुगड्यास । आतांच त्यागितें प्राणनाथा ॥६६॥ सरी गोठ पाटल्या । ठुशी बाकी साखळ्या । नथ बुगड्या कापवाळ्या । मूद राखडी त्यागिली ॥६७॥ कांहीं न ठेविलें अंगावरती जैसी लंकेची पार्वती । धन्य धन्य राधासती । पती आज्ञाधारका ॥६८॥ काळीं कंकणें मात्र करीं । पोत काळी कंठांतरीं । कुंकुम ल्याली कपाळभरी । मुख्य दागिना जाणून ॥ ६९ ॥ बायांस बोले राधा सती । ओटी भरागे त्वरितगती । येथून पुढें रमापती । आहे अमुचा गणगोत ॥७०॥ ऐसें ऐकतां तद्भाषण । बायांचे भरून आले नयन । बोलूं लागल्या गहिंवरुन । राधे आह्मां सोडूं नको ॥७१॥ सती बोले त्यावरी । ही न गोष्ट घडे खरी । सागराकडे गोदावरी । जाणें हाच न्याय पहा ॥७२॥ जिकडे मेघ तिकडे वीज । जिकडे दिवा तिकडे तेज । जिकडे माझे पतिराज । जातील तिकडे जाय मी ॥७३॥ बोभाटा झाला गांवांत । कीं माधवाचार्य पत्नीसहित । झाले असती विरक्त । गृह सोडून निघाले ॥ ७४ ॥ जो तो मनुष्य आचार्यासी । सदनीं रहाया उपदेशी । परी तें न रुचे मानसीं । निघते झाले पत्नीसह ॥ ७५ ॥ जैसी नलामागें दमयंती । वा राममागें सीतासती । तैसी राधा निश्चिती । पतीमागें चालली ॥ ७६ ॥ ऐसें तें दपंत्य । आलें लव्हराळग्रामाप्रत । वंदन जराभूमीप्रत । करूनियां निघाले ॥७७॥ आले पुढें वनवसासी । माधवाचारी पुण्यराशी । तेथें कथा घडली कैशी । ती ऐका सांगतों ॥ ७८ ॥ सोनाजीपंत कुळकर्णी । होता वनवसामाजी

जाणी । त्यानें घेतलें ठेवूनी । आचार्यासीपत्नीसह ॥ ७९ ॥ माधवाचे मनीं तळमळ । लागलीसे बहुसबळ । कीं सच्चिदानंद घननीळ । कधीं भेटेल मजलागीं ॥ ८० ॥ अपरोक्ष ज्ञानभांडाराची । किल्ली होय सद्गुरु साची । गुरुकृपेवीण देहाची । नोहे कदा सार्थकता ॥ ८१ ॥ गुरु करावा ह्मणती कोण । हीच चिंता रात्रंदिन । जैसा कृपणद्रव्यार्जन । करण्या तळमळ करीतसे ॥ ८२ ॥ तों एकेदिनी सोनोपंत । बोलले माधवाचार्यप्रत । माझे गुरु खंदारांत । साधु महाराज असती ॥ ८३ ॥ जे अवतारनाथांचे । श्रीदत्तगुरु ज्याचे । जे अपरोक्षज्ञानाचे । आहेत जाणा सागर ॥८४॥ त्यांचे पदा जावें शरण । तरीच होईल कल्याण । ते गुरु केल्या आपण । कृतार्थ व्हाल जगत्रयीं ॥ ८५ ॥ तें मानलें माधवासी । आले उभयतां खंदारासी । वंदन करून सद्गुरुसी । कर जोडून बैसले ॥ ८६ ॥ आचार्य ह्मणती गुरुनाथा । परमपूज्य परम पवित्रा ।मायबापा कृपावंता । उद्धार माझा करावा ॥ ८७ ॥ मी पदा आलों शरण । परत न लोटीं मजलागून । तूं गोदा परम पावन । मी ओहोळ दयाळा ॥ ८८ ॥ माझा करा अंगिकार । मस्तकीं ठेवा वरदकर । मी या पदांचा किंकर । उपेक्षूं नका सर्वथा॥८९॥ ऐकून भाषण माधवाचें । चित्त द्रवलें समर्थाचें । जैसें बाळ पाहून जननीचें । स्तनी फुटती दुग्धधारा ॥ ९० ॥ साधनचतुष्टयसंपन्न । माधवाचार्य पाहून । श्री साधुमहाराज कृपाघन । वळंगला त्यावरी ॥९१॥ उपदेश दिव्य मंत्राचा । केला आचार्याचे कर्णी साचा । कृपाप्रसाद सद्गुरुचा । अलौकिक जगत्रयीं॥९२॥ शिरीं ठेविला वरद कर । अध्यात्म विद्येचे प्रकार । कैसा योग्यायोग्य विचार । कथन केला माधवासी ॥९३॥ त्यासीच म्हणावें सद्गुरु । जो भावार्णवींचा होय

तारू । निजभक्तांना कल्पतरु । कल्पिलें फळ देणारा ॥ ९४ ॥ ना तर भूमीवर । गुरु झाले कवडी शेर । वाहून मस्तकीं जटाभार । जगाला नाडिती ॥९५॥ रेखून लेती टिळेमाळा । भांदिती आयाबायांला । उप देश देऊन तियेला । हेम दक्षिणा मागती ॥९६॥ श्रीतुकाराम वैष्ण भक्त । बोलिले एका अभंगांत । कीं ऐसे भोंदू संत । जिवें मारी घालावे ॥९७॥ तैसे न साधुमहाराज । ईशभक्तीचा दिव्य ध्वज । जग दोद्धार हें काज । करण्या जन्मले भूमीवरी ॥९८॥ असो एवंच उपदेश माधवासी । झाला खंदारग्रामासी । नंतर आले वनवासासी । आपुल गृहाकारणें ॥९९॥ धरिली वृत्ति अयाचित । सांप्रदायानुरूप सत्य अन्न आल्या अतिथाभ्यागत । घालिती आचार्य अत्यादरें ॥१००॥ ऐस क्रम चालतां । काय घडलें तत्वतां । तें येथें सांगतों आतां । अवधा द्यावें कथेसी ॥१०१॥ आचार्य सद्भावें करून । निज गुरूचें करित ध्यान । तों गुरुपादांगुळीं जाण । जखम ध्यानीं पाहिली ॥१०२॥ बोटास चिंधी बांधिली । धार पाण्याची वरी धरिली । तेणें तळम गुरुमाउली । ऐसें ध्यानीं पाहिलें ॥ १०३ ॥ तें सत्यासत्य पाहण जाण । निघाले खंदारालागून । माधवाचार्य सोंवळ्यानें । घेऊन घ्याल हातामध्यें ॥१०४॥ निघते झाले तांतडी । पळतां भुई झाली थोडी पहा आस्था केवढी । याचें नांव गुरुभक्ती ॥१०५॥ खंदार वनवास पासून । आठ कोस पूर्वेस जाण । न म्हणाले ऊन तहान । चाल पळत रस्त्यानें ॥१०६॥ घाम आला शरीरासी । न उचलवे पाऊ त्यासी । अस्तमानचे समयासी । खंदारांत पोहांचले ॥१०७॥ जैं ध्यानीं पाहिलें । तैसें प्रत्यक्ष देखिलें । तेणें चित्त कळवळलें जखम पाहतांच सद्गुरुची ॥ १०८ ॥ केला साष्टांग नमस्कार

उभे ठाकले जोडून कर। नयनीं लोटिं तेव्हां नीर। दाटला कंठ न बोलवे ॥ १०९ ॥ ऐसी स्थिती पाहून । साधुमहाराज हास्यवदन । करूनियां भाषण । करते झाले तयासी ॥ ११० ॥ हे गम वत्सा माधवा । कां आलासि येधवां । चिंता कोणती तुझे जिवा । लागली बाळा सांग मशीं ॥ १११ ॥ तें हळूच बोलती आचार्य । येथें न माझें कांहीं कार्य । परी आज दिली हे दिव्य पाय । पहावे ऐसें वाटलें ॥ ११२ ॥ परी अंतरज्ञानांनीं । सर्व जाणिलें सद्‌गुरूनीं । माधवासी हृदयीं धरूनी । दोन्हीं हातें कवटाळिलें ॥ ११३ ॥ जेवीं मारुती आणितां द्रोणागिरी । संतोषला रावणारी । साधुमहाराजा तैशापरी । हर्ष झाला श्रोते हो ॥ ११४ ॥ सद्‌गुरु म्हणती माधवामत । तूं खरा खरा रे गुरुभक्त । जखम माझी पाहण्या सत्य । धांवुन आलास ये ठायां ॥ ११५ ॥ कल्याण रामदासासी । ना निळोबा तुकोबासी । किंवा गोरख मच्छेंद्रासी । तैसा तूं मशीं माधवा ॥ ११६ ॥ साधुमहाराज इतरांसी । सांगते झाले कौतुकेंसी । पहा पोर माझें उपवासी । आलें कीं हो भेटावया ॥ ११७ ॥ हे माधवाचार्य गुण निधाना । या आधिभौतिक यातना ॥ त्याचें दुःख सज्जना ॥ करूं नये मानसीं ॥ ११८ ॥ शरीर भोगावांचून । कोणी न मानवी जगीं जाण । यावद्देह तावत्सहन । हें केलें पाहिजे ॥ ११९ ॥ प्राण सुखदुःखातीत । पावे न कशाचे आघात । तो ईश्वराचा अंश सत्य । हें जाणती ब्रह्मवेत्ते ॥ १२० ॥ ऐसा उपदेश माधवासी । करिते झाले पुण्यराशी । बाहून सोनोपंतासी । यापरी आज्ञापिलें ॥ १२१ ॥ माझे परी माधवासी । त्वां लेखावें अहर्निशीं । माधव माझा होय शशी । ज्ञानरूपी आकाशींचा ॥ १२२ ॥ त्याचे पदीं निष्ठा ठेवीं । तत्तूंद त्याचो राखावो । त्याची सेवा करितां बरवी । ती पावेल मजलागीं ॥ १२३ ॥ मी आणि माधवांत । मानू नको कदा द्वैत ।

वृक्ष फांद्या न वेगळ्या सत्य। मूळ खोडापासूनी॥१२४॥ ऐसें बोलोनी उभयतांसी। दिलें लावून वनवसासी। माधवाचार्य सिद्धपदासी। पावते झाले श्रोते हो॥ १२५॥ वनवसाचे सान्निध्यास। उजणें गांव नैऋत्येस। असे अवघें दोन कोस। मवाड नदीचे कांठावरी॥१२६॥ रंगोबा नामे रजपूत। होता उजने गावांत। परम भाविक गृहस्थ। उपासक श्रीरामाचा॥१२७॥ त्यानें रामचंद्राच्या मूर्ति। आणिल्या असती निश्चिती। तो एके दिनीं त्याप्रती। दृष्टांत ऐसा जाहला॥१२८॥ मशीं न स्थापी उजन्यांत। येथें न मी राहण्या इच्छित। माझा भक्त वनवासांत। माधवाचार्य नाम ज्याचें॥१२९॥ त्याचे सदनीं नेई मला। क्षणैक न ठेवीं या स्थला। आला मशीं कंटाळा। भक्त भेटी होऊं दे॥१३०॥ माझे भक्त माझे प्राण। माझें निवासाचें स्थान। संतचरण-धूळी जाण। मी वाहातों निज शिरीं॥१३१ पाहून ऐशा स्वप्नासी। रंगोबा आला वनवासासी। स्वप्न माधवाचार्यासी। अवघें केलें निवेदन॥ १३२॥ महाराज म्हणती तयाप्रत। तुशीं झाला दृष्टांत। तैसे प्रभू जानकीनाथ। कां न सांगे मजप्रती॥ १३३॥ समर्थांचे वचन ऐकितां। रंगोबा परत तत्वतां। उजन्याप्रती झाला जाता। निराश होऊन अंतरीं॥ १३४॥ इकडे श्रोते त्याच दिवशीं। उजन्याहून हृषिकेशी। येता झाला वनवासासी। ते कथा अद्भुत॥१३५॥ रात्र झाली तीन प्रहर। अस्ता गेला रोहिणीवर। उषःकाळीं रघुवीर। येता या वनवसा॥१३६॥ सवें सीता लक्ष्मण मारुती। दारीं आले जानकीपती। आचार्यासी वाहती। दार उघडा म्हणोनियां॥ १३७॥ तो कोमलांग राजीवनयन। अजानबाहू सुहास्यवदन। जो कैवल्यदाता आनंदघन। आचार्य दारा तिष्ठला॥ १३८॥ आपाद रुळ वैजयंती। कोटि सूर्यापरी दीप्ति। तो राजाराम दशरथी। भक्तद्वारीं तिष्ठला॥ १३९॥

ष्या शोधितां कंटाळलीं । उपनिषदें अवघीं भलीं । तीं त्राटिकाभक्त वन-माळी । भक्तद्वारीं तिष्ठला ॥ १४० ॥ आचार्यास ह्मणे रघुवीर । उघडीं शीघ्र मशीं द्वार । तुह्मांसाठीं येथवर । सहकुटुंब मीं आलों ॥ १४१ ॥ आश्चर्य तें ऐकून । उघडते झाले द्वार जाण । तो सीतापति नारायण । गुणरूप पाहिला ॥ १४२ ॥ तात्काळ केला नमस्कार । गडबडां लोळे पायांवर । प्रेमानंदें भरून उर । आला निज बांधवांचा ॥ १४३ ॥ गृहांत आणून नारायण । केलें यथासांग पूजन । वनवसग्राम धन्य जाण । चरण लागले रामाचे ॥ १४४ ॥ प्रभु ह्मणे आचार्यासी मशीं स्थाप-वनवासासी । मी रहाया तुजपाशीं । अक्षयींचा इच्छितों ॥ १४५ ॥ माझा अवतार तुह्मांसाठीं । मशीं न कदा परते लोटीं । असूं दे तुझ्या दारवंटीं । सदैव मशीं भक्तराया ॥१४६॥ पहा केवढा संतांचा अधि-कार । विनवणी करी रमावर । संत साक्षात् परमेश्वर । निर्माण झाले भूमीवरी ॥ १४७ ॥ आचार्य तें ऐकून । बोलते झाले कर जोडून । वनवासामाजीं स्थापीन । तुजलागीं नारायणा ॥१४८॥ अनायासें चिंता-मणी । चालून आला माझे सदनीं । तो काय देऊं फेकूनी । मूर्खत्व आपुलें दावावया ॥१४९॥ असो दुसरे दिवशीं उपवासी । पाचारण धाडिलें रंगोवासी । घेऊन त्याच्या विचारासी । केली श्रीची स्थापना ॥ १५० ॥ त्याच मूर्ति वनवासांत । आहेत अजूनपर्यंत । रावणारी रघुनाथ । भक्तवत्सल खराचि ॥ १५१ ॥ टळोपाकीं पसरली मात । कीं माधवाचार्य भगवद्भक्त । आला चालून रमानाथ । त्याकारणें वनवासीं ॥१५२॥ असमंत भागीं ख्याति झाली । जपूं लागली मंडळी । छत्रपांदी भोंवतालीं । माधवाचार्य साधूच्या ॥ १५३ ॥ कोणी संतुक-राव बापू ह्मणून । होते धानुरचे देशमुख जाण । पोटीं नव्हतें संतान । विणें कष्टी सर्वदा ॥ १५४ ॥ तया संतुकरावाची । ताई नामें भार्या

साची । तिनें कीर्ति आचार्यांची । ऐकून आली दर्शना ॥ १५५ ॥ या ताईचें वयास । वर्षे गुदरून गेलीं पन्नास । सखुकराव दापुस । वर्ष पासष्टावें हो ॥ १५६ ॥ अशा वेळीं संततीची । आस करणें व्यर्थ साची । वर्षाकालीं वसंतांची । वाट पाहणें व्यर्थ जसें ॥ १५७ ॥ असो ताईनें लोटांगण । घेऊन धरिले समर्थचरण । करूनियां दीन वदन । आचार्यासी बोलली ॥ १५८ ॥ ल्हराळचे देशमुखाचा । वंश बुडूं पाही साचा । धरा अभिमान कांहीं याचा । तेथील अहो जोशी तुह्मी ॥ १५९ ॥ ऐकून प्रार्थना ताईची । माय द्रवली अनाथाची । संत भूत दयेची । मूर्ति जाण प्रत्यक्ष ॥ १६० ॥ एक श्रीफल खारका दोन । दिला प्रसाद तिजलागून । तिनें केलिया भक्षण । संतती होईल म्हणाले ॥ १६१ ॥ तेंच पुढें सत्य झालें । ताईनें पुत्रमुख पाहिलें । उभयतांहि हरिखले । धन्य ह्मणती आचार्य ॥ १६२ ॥ महाराज असतां वनवसांत । वसंत अठराशें अडसष्टांत चैत्र शुद्ध पक्षांत । काय घडलें तें ऐका ॥ १६३ ॥ तिथी होती एकादशी । रविवार होता ते दिवशीं । प्रभातींचे समयासी । महाराज होते आसनस्थ ॥ १६३ ॥ सोनोपंतादि मंडळी । बहुत होती भोंवताली । जेवीं मधुरतव भ्रमरावली । सुमनाभोंवती बैसते ॥ १६४ ॥ तों एकाएकीं समर्थ नयन । दुःखाश्रूंनीं भरले जाण । अवध्यांसी बोलले गर्जून । ह्मणा नारायण मोठ्यानें ॥ १६५ ॥ परी यांचें ईंगित । नच कळलें कोणाप्रत । पुसूं लागले सोनोपंत । अश्रु नयनीं कां आले ॥ १६६ ॥ आचार्य ह्मणती तयाला । काय सांगूं बापा तुजला । सद्गुरु माझे ये वेळां । उंबरखेडीं शिव झाले ॥ १६७ ॥ त्यागिलें त्यांनीं शरीर । गेला माझा परमेश्वर । प्रत्यक्ष नाथाचा अवतार । दुरावला आपणां ॥ १६८ ॥ मोठ्यानें आरोळी मारिली । हे साधु महाराज माउली । कोण कृ(?) बी

साउली । करील आतां माझेवर ॥ १६९ ॥ या प्रांतींचा कोहिनुर घेऊन गेला काळ चोर । विझाला ज्ञानदीप साचार । कालरूपी वाऱ्यानें ॥ १७० ॥ काय माझा राग आला । म्हणून गेलांत वैकुंठाला । आतां कोण हृदयीं मजला । धरील सांग प्रेमानें ॥ १७१ ॥ ज्ञानरूपी प्रेम-पान्हा । कोण पाजील दयाघना । या मुमुक्षु तव वत्सांना । दीनदयाळा सद्गुरो ॥ १७१ ॥ समस्त मंडळी शोकसागरीं । त्या वेळीं बुडाली खरी । रात्र शोकांत गेली सारी । कांहीं न सुचे कवणाला ॥ १७३ ॥ आचार्यांनीं अन्नपाणी । कांहीं न घेतलें त्या दिनीं । साधुमहाराज त्यांचे स्वप्नीं । आले रात्रसमयाला ॥ १७४ ॥ हे मदीय वत्सा माधवा । शोक नाहीं ऐसा बरवा । कांहीं विचार करावा । जन्ममरण या गोष्टीचा ॥ १७५ ॥ जो जो आला जन्माप्रत । तो तो मरणार निश्चित । जेथें उदय तेथें अस्त । हा न्याय जगाचा ॥ १७६ ॥ जळीं विराली जळ-गार । परी न नष्ट झाली साचार । झालें मात्र रूपांतर । तोच प्रकार येथींचा ॥ १७७ ॥ न करीं वेड्या शोक जरा । पांघरूं नको मायां-बरा । तूं ब्रह्मवेत्ता असून पुरा । शिशुवत रडतोसी ॥ १७८ ॥ मी सर्वां-तर्यामी व्यापक । ऐसी भावना करीं देख । तेणें पुन्हां ऐसा शोक । न होत तुजलागीं ॥ १८१ ॥ या पाहून स्वप्नासी । आचार्य आनंदले मानसीं । टाकून शोकमोहासी । आनंदेंसी राहिले ॥ १८० ॥ सृष्टी नियमानुसार । झाले तया तीन कुमर । निवृत्ति व ज्ञानेश्वर । तुकाराम धाकुटा ॥ १८१ ॥ पुढें जगदोद्धारा भूमीवरी । महाराज निघाले सत्वरीं । आले असती राजुरी । वरताळ ग्रामासन्निध ॥ १८२ ॥ तेथें गोविंदराव नांवाचें । पोर सोळा वर्षांचें । राहणार जें देवग्रंथाचें आलें । उपदेश घ्यावया ॥ १८३ ॥ देऊं त्यासी उपदेश । ठेऊन घेतलें सान्निध्यास । अप्पादेव तयास । लोक बोलूं लागले ॥ १८४ ॥ दुसरे शिष्य मनोहर । त्यांचे जेष्ठ सहोदर ।

जयरामभाऊ साचार। नाम ज्याला शोभलें ॥ १८५ ॥ दाजीचे चौथे साचे। विठ्ठल शास्त्री चाकुरचे। जे राम जोशीबुवाचे। दोहे प्रती अवतार ॥१८५॥ काव्यकुशल महाचतुर। सरस्वतीच्या पुढे जोडी कर। अधिकार पूर्ण भापेवर। महाव्युत्पन्न शास्त्रवेत्ता ॥८७॥ असो संवत अठराशें चौऱ्याशींत। जेष्ठ मासीं वद्यपक्षांत। काय घडलें वनवसांत। तें ऐका सांगतो ॥१८८॥ देवी कराल लंब स्तनीं। अघोर रूपा क्रूर वदनी। मुक्त केशा विचित्र वसनी। सिंदुर भालीं जियेच्या ॥ १८९ ॥ खदिरांगारापरी नयन। अंगीं कंचुकी हरित वर्ण। केलें मुंडमाळा धारण। प्राकृत नामपरी जिचें १९०॥ ती आली वनवसांत। परी प्रवेश करण्या ग्रामांत। न तिचा हिय्या होत। आचार्यांच्या पुण्य-बळें ॥१९१॥ फिरे गांवाचें भोंवतीं। पहा साधुची केवढी भीति। अखेर तिनें काढिली युक्ती। महाचतुर कराला ॥१९२॥ माधवाचार्यां चिये द्वारीं। जाऊन याचकाचे परी। भिक्षा तयाला साचारी। मागेल दीन वाणीनें ॥१९३॥ मग तो आचार्य जरी मजला। नाहीं म्हणेल भिक्षेला अनायासें। सत्त्वाला। हानी होईल तयाच्या ॥१९४॥ तो हीन झाल्यावर। गांवांत माझा चालेल जोर। संत औदार्य म्हणती थोर। पाहूं प्रचिती तयाची ॥१९५॥ ऐसा विचार करूनी। दोन प्रहर होतां यामिनी। आचार्यांचिये सदनीं। येती झाली कराला ॥ १९६ ॥ करून जागे समर्थास। मागूं लागली भिक्षेस। मानवी प्राणी भक्ष-ण्यास। मला पाहिजेत ये वेळां ॥ १९७ ॥ तो कपट हेतु तियेचा। आचार्यासी कळला साचा। हिय्या करून मनाचा। बोलते झाले परीसी ॥ १९८ ॥ माझ्या रक्तमांसाचे। जे संबंधीं असतील साचे। भक्षण करावें तूं त्यांचें। गांवास धक्का लावूं नको ॥ १९९ ॥ पाहा केवढे उदार संत। गांवासाठीं आपुला घात। घेतला करून धाचांत। कोणी न

दयाळ संतांपरी ॥ २०० ॥ प्रथम दिवशीं राधाबाई । भक्षिती झाली मरी पाही । ऐन दुपारचे समयीं । वद्य चतुर्दशीस ॥ २०१॥ अस्तमानीं दोघे कुमर । तुकाराम ज्ञानेश्वर । मरिनें भक्षिले साचार । तिसरे दिवशीं निवृत्ति ॥१०२॥ आषाढ शुद्ध चतुर्थीसी । पाहून अवघ्या मंडळीसी । बोलले महाराज प्रेमेसी । आज माझें निर्वाण ॥ २०३ ॥ दोनप्रहरा-नंतर । मी पाहीन वैकुंठपुर । माझ्या मागें गादीवर । अप्पादेव बस-वावा ॥ २०४ ॥ तों एकरेंच उलटी झाली । मंडळी अवघी घाबरली । समर्थांनीं आज्ञा केली । गोमयें भूमि शुद्ध करा ॥ २०५ ॥ श्वेत घोंगडी अंथरा वरी । वेळ आली जवळी खरी । सच्चिदानंद श्रीहरी । वाट माझी पाहतो ॥ २०६ ॥ निजकंठीची तुळसीमाळ । अप्पादेवाच्या घातली गळां । चालीव संप्रदायाला । राहोनिया वनवसी ॥ २०७ ॥ दाजी आणि मनोहर । हे माझे बंधु साचार । कदा त्यांना अन्तर । देऊं नको शिष्यवरा ॥ २०८ ॥ सोनापंतादि मंडळीसी । आशीर्वाद दिला प्रेमेसी । निर्वाणिरव करूनि ऐसी । गेले आपण वैकुंठा ॥२०९॥ म्हणून रामनाम त्रिवार । त्यागिलें जड शरीर । माधवाचार्य महा थोर । पुण्यपुरुष पुण्यात्मे ॥ २१० ॥ हे माधवाचार्य महासंत । होऊन गेले वनवसांत तया माझा दंडवत । वारंवार असो हा ॥२११॥ स्वस्तिश्रीसंत-कथामृत । यथामती वदलों सत्य । हंसक्षीरन्यायें त्यामत । सेवा म्हणे दासगणू ॥ २१२ ॥ श्री हरिहरार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥

॥ इति षोडशोऽध्यायः समाप्तः ॥

# अध्याय १७

श्रीगणेशायनमः । तूं सर्वव्यापी परिपूर्ण । काय देऊं नामाभिधान । तें न सुचे मजलागून । अगम्यरूपा लंबोदरा ॥ १ ॥ आतां श्रोते या अध्यायीं । संताचार्य कथा पाहीं । ज्याची भक्ती सद्गुरुपायीं । जडली असे एक निष्ठें ॥ २ ॥ लव्हाळग्रामाभीतरीं । आचार्यांचे कुलांतरीं । संताचार्य निर्धारीं । जन्म घेते जाहले ॥ ३ ॥ संताचार्य फिरत फिरत । सहज आले वनदसांत । माधवाचार्यांची ती तेथ । गांठी पडली सहजगती ॥ ४ ॥ माधवाची विरक्तता । पाहून आचार्यांचे चित्ता । उपजती झाली विरक्तता । धिक्कार असो म्हणती मज ॥ ५ ॥ नरजन्मास येउनी । सार्थक केलें माधवांनीं । मी साच वृषभ होवुनी । संसार गाडा ओढिला ॥ ६ ॥ ज्यांचेसाठीं आजवरी । म्यां कष्ट केले नानापरी । त्यांतील एकही माझ्यापरी । नये अंती कामातें ॥७॥ ते सोबती सुखाचे । कोणी न सांगाती निर्वाणीचे । म्यां आजवरी ओझें त्यांचें । व्यर्थ कीं हो वाहिलें ॥ ८ ॥ ऐसे होवून उद्विग्न । पुसती माधवाचार्यालागून । आपण गुरु केले कोण । तें सांगा मजप्रती॥९॥ माधवाचार्य म्हणती त्यावरी । म्यां गुरु केले खंदारीं । जे नाथावतार भूमीवरी । आले जगदोद्धारास्तव ॥१०॥ ऐसें ऐकतां अमोघ वचन । संताचार्यांचें हर्षलें मन । तात्काळ खंदारा लागून । आले गुरु करावया ॥११॥ देहाभिमान टाकून । दृढ धरिलें सद्गुरुचरण । जैसी शर्करेलागून । पिपीलिका झोंबतसे ॥१२॥ मी पतीत पामर । नाना दोषांचें आगर । चित्त गोंविलें आजवर । नाशिवंत संसारीं ॥१३॥ नाना खटपटी करून । केलें आजांचें पोषण । सच्चिदानंद नारायण । नाहीं कधीं आठविला ॥१४॥ कित्येकांचे केले घात । वाणीनें वदलों असत्य ।

मम पापांचें करितां गणित। होईल बेरीज लक्षाची ॥ १५ ॥ उद्धार केल्या सज्जनाचा। लौकिक नोहे यांत तुमचा। मजसारख्या पतिताचा। केल्या कीर्ति होईल ॥१६॥ दुष्ट दुरात्मा फणिवर। अवघे करिती अव्हेर। परी भगवान शंकर। तयाला कंठीं धरितसे ॥ १७ ॥ ओलें वाळलें न ह्मणे अग्नी। पापी शुद्ध न ह्मणे स्वर्धनी। बरी वाईट मेदिनी। मेघ न पाहे वर्षतां ॥ १८ ॥ साधुमहाराज तें ऐकुनी। द्रवते झाले आपुल्या मनीं। संताचार्यास देऊनी। अभय ठेवून घेतलें ॥ १९ ॥ परीक्षा त्याची एके दिनीं। पाहण्या युक्ति समर्पनीं। योजूनिया आपले मनीं। बोलले संताचार्याला ॥ २० ॥ मी जेव्हां होतों लहान। तेव्हां वाकयवडा मजलागून। झाला सव्य हात जाण। छिद्रें पडलीं अगणित ॥ २१ ॥ तैं मम व्याधी होण्या दुरी। नवस बोलिली जननी खरी। विठ्ठल होवूनी अन्तरीं। बद्धांजळी करूनियां ॥२३॥ माझ्या पुत्राचा सव्य हात। होवो पुन्हा पूर्ववत। वाहीन त्यावरी त्या गोष्टीचा। आठव न राहिला कवणातें ॥ २४ ॥ काल रात्रीं स्वप्नांतरीं। आला माझा मल्हारी। बोलता झाला ऐशापरी। तें एक सांगतों ॥२५॥ हात करून सोन्याचा। मज वाहीं शीघ्र साचा। ना तरी प्राणांताचा। समय तुझा निश्चयें ॥ २६ ॥ वा विकत घेऊन मनुष्य। तोडून त्याचे करास। येऊनि माळेगांवास। मजलागीं अर्पावा ॥२७॥ या चिंतेंत माझें मन। आहे सकाळपासून। सव्वा शेर सोडून। सुवर्ण आणूं सांग पां ॥ २८ ॥ विकत घेऊन मानवाला। जरी तोडूं कराला। तरी भागवत धर्माला। तें करणें उचित नसे ॥ २९ ॥ ऐशी झाली आड विहीर। कैसा करूं मी विचार। तैं संताचार्य जोडून कर। बोलूं लागले सद्गुरुसी ॥३०॥ मी आपल्या करासी। तोडूनियां स्वयेंसी। नेऊन माळेगांवासी। वहातों चिंता करूं नका ॥ ३१ ॥

आपलेसाठीं तुटतो हात । तेणेंच मी कृतार्थ । आपण परब्रह्म साक्षात । धनी माझ्या देहाचे ॥ ३२ ॥ स्वामी सद्गुरु धौम्यमुनी । त्याचे शेता न चढे पाणी । ऐसें तच्छिष्यानें पाहोनी । केला बंधारा तनूचा ॥३३॥ तेणें झाला कृतार्थ । ऐसें ऐकिलें भारतांत । गुरुप्रीत्यर्थ प्राणांत । घडतां मोक्ष रोकडा ॥ ३४ ॥ ऐसें बोलून उठला त्वरित । तो संताचार्य गुरुभक्त । गुरुसाठीं सव्य हात । छेदिण्यासी सिद्ध झाला ॥३५॥ वामहस्तें करून वार । तात्काळ तोडिला सव्य कर । अशुद्धाचा लोटला पूर । पहा केवढी गुरुभक्ती ॥३६॥ हें ऐकितां जमले लोक । नरनारी करिती शोक । हा गुरु न म्हणावा निःशंक । नरदेहधारी व्याघ्र हा ॥ ३७ ॥ साधुमहाराज आचार्यासी । म्हणती माळेगांवासी ! जाऊन हात मल्हारीसी । वाहोनी यावें सत्वर ॥ ३८ ॥ गुरुआज्ञा ऐसी होतां । आचार्य निघाले तत्वतां । हात वहाण्या म्हाळसानाथा । माळेगांवा माझारी ॥ ३९ ॥ जखमेस चिंध्या बांधून । तळ्यामाजी केलें स्नान । राउळासी घेऊन । कर वाहिला देवासी ॥ ४० ॥ हे मणिमल्लांच्या अंतका । हे म्हाळसा बाणुनायका । भक्तवत्सला वरदायका । हयवाहना पशुपती ॥ ४१ ॥ सद्गुरुचा फेडिण्या नवस । आलों तव सान्निध्यास । स्वीकारीं या करास । दीनदयाळा मार्तंडा ॥ ४२ ॥ ऐसी ऐकतां विनवणी । प्रकट झाला खड्गपाणी । दोही हातें कवटाळूनी । हृदयीं धरिलें आचार्या ॥ ४३ ॥ पीत भंडार भाळीं । कंठीं सोन्याची पडदळा । ती मल्हाररूप चंद्रमौळी । बोलता झाला या रीती ॥ ४४ ॥ तूं खरा खरा रे गुरुभक्त । गुरुसाठीं तोडिला हात । तेणें तुझी त्रिभुवनांत । कीर्ति होईल निश्चयें ॥ ४५ ॥ पाहून ही गुरुभक्ती । प्रसन्न झालों तुजप्रती । जी इच्छा असेल चित्तीं । ती तूं माग मजलागीं ॥ ४६ ॥

# श्रीसाईनाथ

श्रीगुरुर्जयति

श्रीसद्गुरुपदद्वंद्वं । निर्द्वंद्वदपदायकम् ।
द्वंद्वातीतमहं वंदे । द्वंद्वदुःखैकभेषजम् ॥ १ ॥
द्वितीयेस्मिन्प्रकरणे । वंद्यवंदकथावनाम्
विलोक्य ज्ञानदेवेन । कृतं श्रीगुरुवंदनम् ॥ २ ॥

## द्वितीयम् प्रकरणम्

### श्रीर्जयतितराम्

मू. ओ. आतां उपायवनवसंतु । जो आज्ञेचा आहेव तंतु ।
अवतारचि जो मूर्तु । कारुण्याचा ॥ १ ॥

सं. श्लो. अधुनोपायविपिने । वसंतो यो विराजते ।
सौभाग्यतंतुर्विद्यायाः । मूर्तिमान् करुणार्णवः ॥ १ ॥

मू. ओ. अविद्येचे आडवें । भुंजीत जीवपणाचें भवें ।
तया चेतन्याचे धावें । धावणेकारु जो ॥ २ ॥

सं. श्लो. अनाद्यविद्याविपिने । जीवभावेनयद्भ्रमत् ।
चैतन्यं तत्समुद्धर्तुं । कृपया यो भिधावति ॥ २ ॥

मू. ओ. मोडूनिया मायाकुंजरु । मुक्तिमोतियाचा चोगरु ।
जेववितें श्रीगुरु । निवृत्ति वंदूं ॥ ३ ॥

सं. श्लो. मायेभनुपसंहृत्य । मुक्तिमुक्ताफलौदनम् ।
भोजयेत्सद्गुरुर्यस्तं । निवृत्तिं प्रणमाम्यहम् ॥ ३ ॥

मू. ओ. जयाचेनि अपांगपातें । बंध मोक्ष पाणी आतें ।
भेटे जाणतया जाणतें । जयापाशीं ॥ ४ ॥

सं. श्लो. यत्कृपापांग पातेन । बंधो मोक्षत्वमाप्नुयात् ।
ज्ञाता ज्ञातारयन्वेति । यस्य संनिधि मात्रतः ॥ ४ ॥

मू. ओ. कैवल्य कनकाचिया दाना । न कडसिथोर साना ।
द्रष्ट्याचिया दर्शना । पाडाऊ जो ॥ ५ ॥

सं. श्लो. **कैवल्य हेम दाने यो । नोत्तमाधम मीक्षते ।**
**द्रष्टुश्च दर्शनोयोग्यै । समर्थः संप्रकीर्तितः ॥ ५ ॥**

मू. ओ. सामर्थ्याचे निधिकें । जो शिवातेंही गुरुत्वें जिंके ।
आत्मा आत्ममुख देखे । आरसा जियें ॥ ६ ॥

सं. श्लो. **स्वसामर्थ प्रभावाद्यो । गुरुत्वे न शिवं जयेत् ।**
**पश्येदादर्शकेय स्मिश्च । त्मापि ह्यात्मनो मुखम् ॥ ६ ॥**

मू. ओ. बोधचंद्राचिया कळा । विखुरतियेक वेळा ।
कृपा पुणीव लीला । करी जयाची ॥ ७ ॥

सं. श्लो. **बोधचंद्रकला या वा । विकीर्णास्तत्र तत्रहि ।**
**वसंत्येकत्रतः सर्वा । यत्कृपा पौर्णिमा तिथौ ॥ ७ ॥**

मू. ओ. भेटलियाचीसवे । पुरती उपायाचे धावे ।
प्रवृत्ति गंगा थिरावे । सागरीं जिये ॥ ८ ॥

सं. श्लो. **समाप्तं स्यादुपायानां । धावनं यस्य दर्शनात् ।**
**प्रवृत्ति लक्षणा गंगा । स्थिरास्याधत्र सागरे ॥ ८ ॥**

मू. ओ. जयाचेनि अनवसरें । द्रष्टाले दृश्याचे मोहिरें ।
जो भेटत खेंव सरे । बहुरूपचि हें ॥ ९ ॥

सं. श्लो. **यस्यानवसरे द्रष्टा । मूढः सन्यातिदृश्यताम् ।**
**बहु रूपमिदं सर्वं । विनश्येद्यस्य सेवनात् ॥ ९ ॥**

मू. ओ. अविद्येचे कां लवके । स्वबोधो सुदिनें फांके ।
सिवत लेन प्रसादार्के जयाचेनि ॥ १० ॥

सं. श्लो. **स्वाज्ञानमंतधा मिश्रं । स्वबोध सुदिनेनतत् ।**
**यत्प्रसादार्क संपर्का । द्याति स्वच्छ प्रकाशताम् ॥ १० ॥**

मू. ओ. जयाचेनि कृपासलिलें । जीव हाटावरि पाखाळे ।
जें शिवत्वहीं थोंकळें । आंगीं नळ्वी ॥ ११ ॥

सं. श्लो. यत्कृपा सलिले स्नातः । शुद्धो जीव इयान् भवेत् ।
यच्छिवत्वमप्यशुचि । नांगे लापयति स्वके ॥ ११ ॥

मू. ओ. राखों जातां शिष्यातें । गुरुपण धाडिलें थितें ।
तऱ्ही गौरव जयातें ! वोसंडिना ॥ १२ ॥

सं. श्लो. रक्षमाणे स्वके शिष्ये । गुरुत्वं हरतिस्थितम् ।
तथापि सहसायं वै । गुरुत्वं न विमुंचति ॥ १२ ॥

मू. ओ. एक पण नव्हे सुखास । म्हणूनि शिष्याचें करुनि मिष ।
जें पाहणेंचि आपली वास । पाहत असे ॥ १३ ॥

सं. श्लो. एकत्वं न सुखायातौ । गुरु शिष्य मिषेणच्च ।
पश्य देवात्मनो रूपं । पश्यतीतिद्विधा भवेत् ॥ १३ ॥

मू. ओ. जयाचेनि कृपा तुषारें । परतलें अविद्येचें मोहिरें ।
परिणमलें अपारें । बोधामृतें ॥ १४ ॥

सं. श्लो. यत्कृपाया स्तुषारेण । परीत्याविद्यकं विषं ।
परिणमत्य पारेण । बोधाख्ये नामृतेनतु ॥ १४ ॥

मू. ओ. वेद्या देतां मिठी । वेदकत्व सुवोनि पोटीं ।
तऱ्ही नव्हेचि उसिटी । दिठी जयाची ॥ १५ ॥

सं. श्लो. दृष्ट्वावेद्यं वेदकोसौ । उदरे याति वैतदा ।
तथापि दृष्टिरुच्छिष्टा । न भवत्यात्मतांगता ॥ १५ ॥

मू. ओ. जयाचेनि सावायें । जिउ उपरू लाहे ।
ब्रह्म तृणा तळीं जाये । उदासें जेणें ॥ १६ ॥

सं. श्लो. यत्सहाय तया नूनं । जीवो ब्रह्मत्वमश्नुते ।
औदासीन्येन यस्याशु । ब्रह्मापि तृणतामियात् ॥ १६ ॥

मू. ओ. उपास्तिवरी राबतिया । उपाय फळीं येती मोडुनियां
वरि बाणलें जयाचें तया । अनुज्ञा कां ॥ १७ ॥

सं. श्लो. **यस्योपास्तेरुपायाः स्युः । फलभारैः सुसंभृताः ।**
**परिपक्व दशामेत्य । संस्थितायदनुज्ञया ॥ १७ ॥**

मू. ओ. जयाचा दिठिवा वसंतु । जंव न रिघे निगम वनाआंतु
तंव आलीया फळीं हातु । न घे पति कीं ॥ १८ ॥

सं. श्लो. **यस्य दृष्टि वसंतोनो । प्रविशेन्नैगमेवने ।**
**तावदात्मफलं तस्य । हस्तेना यातिकर्हिचित् ॥ १८ ॥**

मू. ओ. पुढें दृष्टीचेनि अल्गे । खोचीकीं निवटी मागें ।
येवढिया जैं त्या नेघे । आपणाचें जो ॥ १९ ॥

सं. श्लो. **पुरो दृष्टेः प्रसारेण । स्पष्टैवावर्तते पुनः ।**
**एतावंतं तु विजयं । नैव गृण्हातिचात्मनि ॥ १९ ॥**

मू. ओ. लघुत्वाचेनि मुदलें । बैसला गुरुत्वाचे सेलें ।
नासूनियां नाथिलें । सदैव जो ॥ २० ॥

सं. श्लो. **लघुत्व मूल रूपेण । निवसन् गौरवे पदे ।**
**यन्नास्ति तन्नाशयित्वा । सर्वदा भगवान् हियः ॥ २० ॥**

मू. ओ. नव्हते जळीं बुडिजे । तें घनवटें येणें तरिजे ।
जेणें तरिलियाहि नुरिजे । कवणें ठायीं ॥ २१ ॥

सं. श्लो. **निर्जले मज्जते येन । घनीभूते न तीर्यते ।**
**तीर्णेन नाथ शिष्येत । येन कुत्रापि वास्थले ॥ २१ ॥**

मू. ओ. जेथें आकाश ये सावेव । न बघे अवकाशाची हाव ।
तें कोण्ही एक भरीव । गगन जें ॥ २२ ॥

सं. श्लो. **साथथवाऽयेमाकाशो । न बध्नात्यवकाशताम् ।**
**अस्तिचैवं कश्चिदेकः । संभृताकाश एवयः ॥ २२ ॥**

मू. ओ. चंद्रादि सुशीतळें । घडलीं जयाचेनि मेळें ।
सूर्य जयाचेनि निवळे । कडवसेनि ॥ २३ ॥

सं. श्लो. **चंद्रादीनि सुशीतानि । यत्प्रभा प्रभवा निवै ।**
**यच्छाययाहि सूर्योपि । सोज्वलत्वे न भासते ॥ २३ ॥**

मू. ओ. जीवपणाचेनि त्रासें । यावया आपुलिये दशे ।
शिवहि मुहूर्तु पुसे । जया जोसियासी ॥ २४ ॥

सं. श्लो. **शिवोपि जीव भावेन । त्रासित्वा स्वदशां पुनः ।**
**अयःतुं सुमुहूर्तं वै । दैवज्ञं पृच्छतिस्वयम् ॥ २४ ॥**

मू. ओ. चांदिणें स्वप्रकाशाचें । पांघुरला द्वैत दुणिचें ।
तरी उघडेपण न वेचे । चंद्राचें जया ॥ २५ ॥

सं. श्लो. **स्वप्रभा चंद्रिका द्वैत । द्विगुणा प्रावृतापिवै ।**
**तथापि यस्य चंद्रस्य । प्राकट्यं न व्रजेत्किल ॥ २५ ॥**

मू. ओ. जो उघडू कीं न दिसे । प्रकाश कीं न प्रकाशे ।
असतेपणे नसे । कवणीकडे ॥ २६ ॥

सं. श्लो. **अभिव्यक्तोपिनो भाति । प्रकाशोप्य प्रकाशवान् ।**
**अस्तित्वेनैव नास्तीति । भासते यत्र कुत्रचित् ॥ २६ ॥**

मू. ओ. आतां जो तोइहीं शब्दीं । कें मेळऊं अनुमानाची मांदी ।
हा प्रमाणा येवो नें दी । कवणाहीया ॥ २७ ॥

सं. श्लो. **अधुनायः सशब्दाभ्यां । प्रमाणं किंकरोम्यहम् ।**
**प्रमाणस्याप्य विषयः । सकस्यविषयो भवेत् ॥ २७ ॥**

मू. ओ. बोलाची लिहिपुसे । तेणेंसि चावळों वैसे ।
दुजयाचा रागीरुसे । एकपणाही हा ॥ २८ ॥ श्री.

सं. श्लो. **यत्र शब्दोनिवर्तेत । तेन साकंब्रवीत्यसौ ।**
**द्वितीयस्य तुरोषेण । स्वकत्वस्यापि कुप्यति ॥ २८ ॥**

मू. ओ. प्रमाणचि परिसरे । तवीं प्रमेयचि आविष्करे ।
नवल मेव्युये धुरे । नापणाची ॥ २९ ॥

सं. श्लो. तदामाति प्रमेयंतु । प्रमाणं प्रसरेद्य दा ।
आश्चर्य मस्यधुर्यस्य । नास्तित्वस्यच लाघवम् ॥ २९ ॥

मू. ओ. कांहींबाहीं अलुमालु । जे कांहीं देखिजे येखादे वेलु
हें देखणेंहि विटालु । जयाचा गांवीं ॥ ३० ॥

सं. श्लो. किंचित्कदाचित्समये । पश्याम्य द्वैतभावतः ।
यदामे दर्शनं तत्तु । व्यलीकं सुविनिश्चितं ॥ ३० ॥

मू. ओ. तेथें नमने कीं मी बोलें । केउती सूये पाउलें ।
आंगीं लाउनि नाडिले । नांवें गेणे ॥ ३१ ॥

सं. श्लो. तत्रनत्याथस्तुत्या वा । क्वचाहं निदधे पदम् ।
अंगेसंलाप्य सत्यंतु । येननाम्नैववंचितम् ॥ ३१ ॥

मू. ओ. नाहीं आत्मयाआत्म प्रवृत्ति । मा वाढवितां कां निवृत्ति ।
या नांवाची वायवुंथी । फेडींच ना ॥ ३२ ॥

सं. श्लो. आत्मन्यात्मप्रवृत्तिर्नो । निवृत्तिस्तत्र वैध्वच ।
अथापि नामा चरणं । व्यलीकं न जहाति च ॥ ३२ ॥

मू. ओ. आणि निवर्त्यच्य नाहीं । मानि वर्तविल हाकाई ।
आतां कैसा बैसे ठाईं । निवृत्तिनामाचा ॥ ३३ ॥

सं. श्लो. निवर्त्यमेव नास्त्या द्वौ । निवर्त्त यतिकिं पुनः ।
उपविष्टः कथं तर्हि । निवृत्याख्ये पदे स्वयम् ॥ ३३ ॥

मू. ओ. सूर्यासि आंधारु । काय झाला होता गोचरु ।
परि तमारी हा डगरु । आला जैसा ॥ ३४ ॥

सं. श्लो. अंधकारः स्वरूपेण । कदाचित् गोचरो रवेः ।
तथापि तमोरि रिति । प्रसिद्धिस्तस्य च्या गता ॥ ३५ ॥

मू. ओ. तेसें लटिकेपणें रूढे । जड येणें उजियेडे ।
न घडतेंही घडे । जयाचिया मावा ॥ ३५ ॥

सं. श्लो. जडं प्रकाशते येन । मिथ्या भूतं विरूढति ।
न घटते तद्घटते । यस्य माया विलासतः ॥ ३५ ॥

मू. ओ. हां या मायावशें दाविशी । तें मायिक म्हणोनि वाळिशी ।
अमायीक तंव नव्हेसी । कवणियेची विर्षो ॥ ३६ ॥

सं. श्लो. मायातोदर्शयस्यंगं । मायिकं तन्निषेधते ।
अमायिक स्वरूपस्त्वं कस्याप्य विषयः खलु ॥ ३६ ॥

मू. ओ. शिव शिव सद्गुरु । तुजला गुढा काय करूं ।
एकही निर्धारू । धरूं दे नासिका ॥ ३७ ॥

सं. श्लो. शिव शिव गुरु स्वामिन् । गूढं त्वां किंकरोम्यहम् ।
एकंहि निश्चयं कर्त्तु । न ददासि कथंच न ॥ ३७ ॥

मू. ओ. नामरूपें बहुवसें । उभऊनि पाडिलीं वोसें ।
सत्तेचेनि आवेशें । तोपेसि नामा ॥ ३८ ॥

सं. श्लो. बहुशो नामरूपाणि । व्युत्पाद्योद्गसितानि च ।
परंतु निज सत्ताया । स्फुर्णोस्यावेशतोन किम् ॥ ३८ ॥

मू. ओ. जिउ घेतलिया हि विणें । चाळूं नेणसि साजणें ।
भृत्यु उरे स्वामीपणें । तेही नाहीं कीं ॥ ३९ ॥

सं. श्लो. सख्यं कर्तु न जानासि । जीवित ग्रहणं विना ।
स्वामि भावेन शिष्येत । शिष्योनेदं तथा भवेत् ॥ ३९ ॥

मू. ओ. विशेषाचेनि नांवें । आलत्वही न साहवे ।
किंबहुना न व्हावें । कोणीच यया ॥ ४० ॥

सं. श्लो. विशेषस्या भिधानेन । नामत्वं यत्सहेस्खलु ।
किंबहुना स्यनो भाव्यं । केनात्ये तद्धि निश्चितम् ॥ ४० ॥

मू. ओ. रात्रीं नुरेचि सूर्या । ना तरी लवण पाणियां ।
नुरेचि चेइल्या । निद जैसी ॥ ४१ ॥

सं. श्लो. अथवा रजनी सूर्ये । न तिष्ठे लवणं जले ।
नाचशिप्येद्यथा निद्रा । जागरे सुस्वरूपतः ॥ ४१ ॥

मू. ओ. कापुराचे थळीव । नुरेचि आगीचिया बरव ।
न दिसे रूप नांव । तेसें यया ॥ ४२ ॥

सं. श्लो. कर्पूर व्यक्ति लावण्य । मग्नेश्चापिन तिष्ठति ।
नाम रूपं तथैवास्य । न किंचिदपि तिष्ठति ॥ ४२ ॥

मू. ओ. ययाचिया हातां पायां मीं पडें । कीं वंद्यलें पुढा न मांडे ।
न पडे हा भिडे । भेदाचिये ॥ ४३ ॥

सं. श्लो. वंदनाय भवाम्यग्रे । वंद्यत्वेन न तिष्ठति ।
वंद्य वंदक भेदोयं । एतस्मिन्नैवतिष्ठति ॥ ४३ ॥

मू. ओ. आपणपेंया प्रतिरवि । उदयो न करीच जेवि ।
हा वंद्य नव्हे तेवि । वंदित याही ॥ ४४ ॥

सं. श्लो. न करो त्युदयंभानु । रात्मानं प्रति कर्हिचित् ।
वंदनाय तथै वायं । वंद्योनैव भवेद्ध्रुवम् ॥ ४४ ॥

मू. ओ. कां समोरपण आपलें । नव्हाही जें कांहीं केलें ।
तेसें वंद्यत्व घातलें । हारउनि येणें ॥ ४५ ॥

सं. श्लो. किंचात्मनाः संमुखत्वं । न प्राप्येत कदाचन ।
तथैवानेन वंद्यत्वं । हत्वा निष्काशितं बहिः ॥ ४५ ॥

मू. ओ. आकाशाचा आरिसा । नुठी प्रतिबिंबाचा ठसा ।
हा वंद्य नव्हे तेसा । नमस्कारासी ॥ ४६ ॥

सं. श्लो. आकाशस्य यथा दर्शे नोतिष्ठेत्प्रतिबिंबकम् ।
नमस्काराय वंद्यो सौ । नभवेदिति कौतुकम् ॥ ४६ ॥

मू. ओ. आणि नव्हेल तरी नव्हो । हें विखारें कां घेवो ।
परि वंदि तयाचा ठावो । उरो नेदी ॥ ४७ ॥

सं. श्लो. **न भवेच्चेन्नभवतु । गृण्हीयां वक्रतां कुतः ।**
**वंदकस्यापि यत्स्थानं न ददात्यवशेषितुम् ॥ ४७ ॥**

मू. ओ. आंगौनि एकुणा होलु । फेडितांचि तो बाहेरिळु ।
कडफोटे शालुळु । न फेडितांचि ॥ ४८ ॥

सं. श्लो. **बहिस्थे पल्लवे चैके । स्फोलिते सति सत्वरम् ।**
**नस्फेलितोपि स्फिटति । पल्लव श्चांतरस्थितः ॥ ४८ ॥**

मू. ओ. नाना बिंबपणा सरिसें । घेऊनि प्रतिबिंब नासे ।
नेलें वंदत्व येणें तैसें । वंदितेनसि ॥ ४९ ॥

सं. श्लो. **गृहीत्वा सहितं बिंबं । प्रतिबिंबं विनश्यति ।**
**नीतं वंद्य त्वमेतेन । वंदके नस हैवहि ॥ ४९ ॥**

मू. ओ. नाहीं रूपाची जेथें सोये । तेथें दिठीचें काज आहे ।
आम्हा फळले हे पाये । ऐशिया दशा ॥ ५० ॥

सं. श्लो. **तत्रास्ति दृष्टेः किं कार्यं । न रूपं यत्र विद्यते ।**
**अस्माकं फलितौ । श्रीमत्पादौतादृशी दशाम् ॥ ५० ॥**

मू. ओ. स्नेह गुणाचिया सोहिरिका । निर्वाळिली दीपकलिका ।
ते कां होईल पुलिका । कापुराची ॥ ५१ ॥

सं. श्लो. **प्रज्वलेद्दीप कलिका । गुण स्नेहाग्नि संगतः ।**
**कर्पूर पूलिका सातु । नाप्नुयासंगमात्रतः ॥ ५१ ॥**

मू. ओ. तया दोघां परस्परें । होइना जेव्हां मेळहारें ।
तव दोहींचे सरे । सरिसेचि खेंव ॥ ५२ ॥

सं. श्लो. **अन्योन्यं न द्वयोर्यावत्किंचिदालिंगनं भवेत् ।**
**उभयोस्तत्क्षणी नैव । स्वरूपं नैव शिष्यते ॥ ५२ ॥**

मू. ओ. तेचि देखेना मी ययातें । तंव गेलें वंद्यत्वेंसि वंदितें ।
चेइलिया दोहींकातें । स्वप्निचां जेवीं ॥ ५३ ॥

सं. श्लो. **नपश्ये यमिमं यावद्गतौ वंद्यत्व वंद कौ ।**
**यथा जाग्र दशायांतु । स्वप्न कांतौन तिष्ठतः ॥ ५३ ॥**

मू. ओ. किंबहुना यिया भाखा । द्वैताचा जेथें उपखा ।
फेडुनियां स्वसखा । सद्गुरु वंदिला ॥ ५४ ॥

सं. श्लो. **किमनेन बहूक्तेन । द्वैत रूपं निरस्य वै ।**
**स्वसखा सद्गुरुः साक्षान्निवृत्तिर्वंदितो मया ॥ ५४ ॥**

मू. ओ. याचिया सख्यत्वाचिनवायी । आंगीं येकपणेंहि पावोनि नाहीं ।
कीं गुरुशिष्य दुवाही । पवाडु केला ॥ ५५ ॥

सं. श्लो. **आश्चर्यमस्य सख्यस्य । स्वांगे नैकत्वमप्युत ।**
**गुरु शिष्यात्मक द्वैत । विस्तरो बहुशः कृतः ॥ ५५ ॥**

मू. ओ. कैसे आपणया आपण । दाविलसे सोहिरेपण ।
हा याहूनि विलक्षण । नाहीं ना नोहे ॥ ५६ ॥

सं. श्लो. **कथं द्वैतं विना सख्यं । कृत्वाचात्मानमात्मना ।**
**विलक्षणः स्वयं स्वस्माद्वैतं नास्तीति नो भवेत् ॥ ५६ ॥**

मू. ओ. जग आघवें पोटीं माय । गगना येवढा होऊनि ठाय ।
आहे पणाचि न साहे । कुटि जयाला ॥ ५७ ॥

सं. श्लो. **यस्योदरे जगत्सर्वं । भाति यो गगनोपमः ।**
**तथापि हिनास्ति भाव । निष्कर्ष सहते पुनः ॥ ५७ ॥**

मू. ओ. कां पूर्ण तरी ते आधारु । सिंधु जैसा दुर्भरु ।
तैसा विरुद्धहि पाहुणेरु । जगाचा गांवीं ॥ ५८ ॥

सं. श्लो. **यथा सिंधुः पूर्णतायाः आश्रयोप्यथ दुर्भरः ।**
**विरुद्ध धर्म योयस्व । गृहे प्राघुणिकं तथा ॥ ५८ ॥**

मू. ओ. तमा तेजा कांहीं । परस्परें निकें नाहीं ।
परि सूर्याचा ठायीं । सूर्यचि होती ॥ ५९ ॥

सं. श्लो. **तेजसस्तमसश्चैव । सत्यंवैरं परस्परम् ।**
**परंतु ते उभे सूर्ये सूर्य रूपेण तिष्ठतः ॥ ५९ ॥**

मू. ओ. तैसें एक म्हणतां भेदे । हाचि नानात्वीं नांदे ।
आपणिया आपण विरुद्धे । होतील कायी ॥ ६० ॥

सं. श्लो. **यदेकं भण्यतेतच्च भिन्नं नानेव नंदति ।**
**परस्परं विरुद्धंयद्विरुद्धं तन्नचात्मनः ॥ ६० ॥**

मू. ओ. म्हणोनि शिष्य गुरु नाथु । या दोहीं शब्दाचा अर्थु ।
श्रीगुरुचि परि नांदतु । दोहीं ठायीं ॥ ६१ ॥

सं. श्लो. **अथ शिष्योगुरुश्चेति । शब्दयोरनयोर्द्वयोः ।**
**एकोर्थः श्रीगुरुस्साक्षात् । द्विधारूपेण संस्थितः ॥ ६१ ॥**

मू. ओ. सुवर्ण आणि लेणें । वसतिये केचि सुवर्णें ।
चंद्र आणि चांदणें । चंद्रचि तें ॥ ६२ ॥

सं. श्लो. **सुवर्णचाप्यलंकारः । सुवर्णत्वेन तिष्ठतः ।**
**चंद्रश्चचंद्रिकाचैव । मिलित्वा चंद्र एकलः ॥ ६२ ॥**

मू. ओ. नाना कर्पुर आणि परिमळु । मिळोनि कापुरचि केवळु ।
ना तरी गोडी आणि गुळु । गुळुचि तो ॥ ६३ ॥

सं. श्लो. **कपूरस्तस्य चामोदः । कर्पुरः केवलस्वयंम् ।**
**स्वादश्च शर्कराद्वाभ्यां । शर्करैव विराजते ॥ ६३ ॥**

मू. ओ. तैसा गुरुशिष्याचे निमिसें । हाचि एक उल्हासे ।
जरी कांहीं दिसे । दोनीपणें ॥ ६४ ॥

सं. श्लो. **गुरुशिष्य स्वरूपेण । दृश्यते यद्यपि द्विधा ।**
**तथापि सद्गुरु साक्षादेक एव समुल्लसेत ॥ ६४ ॥**

मू. ओ. आरसी आणि मुखीं । मी दिसत हें उखि ।
ऐसे आपुलिये ओळखी । जाणें मुख ॥ ६५ ॥

सं. श्लो. आदर्शेप्यथवा स्वास्थे । दृश्योहमितिचान्यथा ।
इत्यात्मनः प्रतीतिस्तां । मुखं जानात्य संशयम् ॥ ६५ ॥

मू. ओ. पाहे पां निरंजनीं निदेला । तो निर्विवाद येकला ।
परिचेता चेवविता जाला । दोन्ही तोचि ॥ ६६ ॥

सं. श्लो. निरंजने निद्रितो यो निर्विवादःस एकलः ।
परंचेता चेतयिता सौ । तदासीत्स्वयं द्वयम् ॥ ६६ ॥

मू. ओ. जें तोचि चेता तोचि चेवविता ।
ऐसा हाचि वुझे हाचि वुझविता।गुरुशिष्यत्व नांदविता । ऐसेनि हा ॥६७॥

सं. श्लो. स्वयंचेता चेतयेच्च । वेत्तिवेद्यंच वेदयेत् ।
इत्थंच यद्गुरुत्वंच । शिष्यत्वं नंद यत्यसौ ॥ ६७ ॥

मू. ओ. दर्पणेंवीण डोळा । आपुले भेटिचा सोहळा ।
भोगिता तरी लीळा । सांगताहा ॥ ६८ ॥

सं. श्लो. विनादर्शं यदा दृष्टिः स्वात्म दर्शन संभ्रमम् ।
लभते तर्हिलीलेयं । कनिष्ठा नभवेन्मम ॥ ६८ ॥

मू. आ. एवं द्वैतासि उमसो । नेदि ऐक्यासि विसकुसो
सोयरिकेचा अतिसो । पोखीतसे ॥ ६९ ॥

सं. श्लो. अदत्वा स्फुरितुं द्वैत मैक्यं चापि विघट्टितुम् ।
सख्यस्य चाप्यतिशयं । पुष्णातीत्यनि कौतुकम् ॥ ६९ ॥

मू. ओ. निवृत्ति जया नाव । निवृत्ति जया भरव ।
जयाची निवृत्तीच राणिव । निवृत्तीचि ॥ ७० ॥

सं. श्लो. निवृत्तिर्नामयस्यैव । निवृत्तिर्यस्य सौभगम् ।
यस्यैश्वर्यं निवृत्तिश्च । निवृत्तिः सच केवलः ॥ ७० ॥

मू. ओ. वांचुनि प्रवृत्ति विरोधें । निवृत्तीचेनि बोधें ।
आणिजे तैसी या वादें । निवृत्ती नव्हे ॥ ७१ ॥

सं. श्लो. **प्रवृत्तेश्च विरोधेन । निवृत्तेश्चैव बोधनात् ।**
**आनीयते तया शब्दो । निवृत्तिर्नभवे ध्रुवम् ॥ ७१ ॥**

मू. ओ. आपणया देऊनि राती । दिवसा आणि उन्नती ।
हा रवि निवृत्ती । तैसा नव्हे ॥ ७२ ॥

सं. श्लो. **दत्वात्मानं यथा रात्रीर्दिन मुन्नति मानयेत् ।**
**अन्यस्या पेक्षयाचासौ । नीवृत्तिर्नभवेत्ध्रुवं ॥ ७२ ॥**

मू. ओ. चोपसिळेनें बळ । घेऊनि मिरवो रत्नकिळ ।
तैसें रत्न नव्हे निखिळ । चक्रवर्ती हा ॥ ७३ ॥

सं. श्लो. **उद्वर्तन बलेनैव । रत्नं सोज्ज्वल तामियात् ।**
**तदिदं न भवेद्रत्नं । चक्रवर्तिः स्वराड्यम् ॥ ७३ ॥**

गगनां हिरूनि पोटीं । चंद्राची पघळे पुटी
तैं चांदणियाचि उटी । आंगासिचि कीजे ॥ ७४ ॥

सं. श्लो. **प्रवेशं चोदरे व्योम्नः । चंद्र पुष्ट्या विवर्धति ।**
**तद्वातच्चंद्रिका चंद्रे पतित्वा तत्र लुंठति ॥ ७४ ॥**

मू. ओ. तैसा निवृत्तिपणा कारण । हाचि आपणिया आपण ।
घ्यावया फुलचि आलें घ्राण । आपुली द्दती ॥ ७५ ॥

सं. श्लो. **तथा निवृत्ति भावस्य । कारणं स्वयमेव हि ।**
**स्वामोद ग्रहणा यैव । पुष्पं घ्राणमभूत्स्वयम् ॥ ७५ ॥**

मू. ओ. कीं दिठी मुखाचिये । वरव पाठीकडूनि फावे ।
तैं आरसे धांडोळावे । लागतात कीं ॥ ७६ ॥

सं. श्लो. **दृष्टिः स्वमुख लावण्यं । पृष्ठभागे यदाप्नुयात् ।**
**किमर्थं मुकुरायासः । कर्तव्यः सूक्ष्म दर्शिभिः ॥ ७६ ॥**

मू. ओ. कीं रात्रीं गेलिया । दिवसहन आलिया ।
सूर्यपण सूर्या । होवावें असे ॥ ७७ ॥

सं. श्लो. **किं गतायां त्रिया मायां । दिवसेच समागते ।**
**पश्चात्स्वस्योदयं सूर्यः । किं कुर्यात्स्वप्रकाशकः ॥ ७७ ॥**

मू. ओ. म्हणोनि बोध्य बोधुनि । घेपेप्रमाणें साधुनि ।
तैसा नव्हे भरवसेनि । गोसावी हा ॥ ७८ ॥

सं. श्लो. **अतो बोध्येन बोध्येत । प्रमाणैः साध्यतेऽथवा ।**
**तथा सौनभवेत्किंतु । स्वतःसिद्धप्रकाशकः ॥ ७८ ॥**

मू. ओ. ऐसे करणिया विण । स्वयेंचि भजे निवृत्तिपण ।
तयाचे श्रीचरण । वंदिले असे ॥ ७९ ॥

सं. श्लो. **एवं क्रियां विनैवेदं । निवृत्तित्वं स्वयं भवेत् ।**
**तस्य श्रीचरणद्वंद्वमैक्यभावेन वंदितम् ॥ ७९ ॥**

मू. ओ. आतां ज्ञानदेव म्हणे । श्रीगुरुप्रणामे येणें ।
फेडिली वाचा ऋणें । चौवाचांची ॥ ८० ॥

सं. श्लो. **इत्युक्त्वात् ज्ञानदेवः । श्रीगुरोः पदपंकजम् ।**
**प्रणम्य ऋणनिर्मुक्तं कृतं वाचा चतुष्टयम् ॥ ८० ॥**

**इति श्रीज्ञानदेव विरचिते अमृतानुभव राजयोगे श्रीमत्सद्गुरुस्तवनं नाम द्वितीयं प्रकरणम् ॥**

**इति श्रीप्रल्हादकृतायां अमृतानुभवसमश्लोक्यां श्रीमत्सद्गुरुस्तवनं नाम द्वितीयं प्रकरणम् ॥**

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बाळबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धी द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती अगर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला**

"दक्षिणा प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनीं उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. **श्री दासगणू महाराज** यांनीं नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चाफेकर, M. A., LL. B. यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

**श्री पासष्टी-भावार्थ दीपिका**

हा **नरेंद्र बुक डेपो दादर,** मुंबई येथें मिळेल.

कापडी प्रत १० आणे. साधी प्रत ८ आणे.

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जागरण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध राहावें.

**बाळबाळंतिणीकरितां औषधें**

**बाळंत काढा नं. १** पहिल्या दहा दिवसांचा ‌॥१४; **बाळंत काढा नं. २** दहा दिवसानंतर ॥१४; **बाळकडू**:—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ॥८; **कुमारी आसव** लहान मुलांकरितां ॥१२.

**सतत २५ वर्षे लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक**

एक रत्तल १॥१० ) **द्राक्षासव** ( अर्धा रत्तल ॥१४

दीड रत्तल २॥४ ट. ख. पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा कॅटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण-पत्रिका" ही सात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स** आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ × २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, **मुंबई** नं० २

पुणें:—**श्री साईनाथ** आणि **कंपनी.**

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें **अनंत आत्माराम मोरमकर** यांनीं छापून **रा. आ. तर्खड** यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड, बांद्रें येथें प्रसिद्ध केलें.